## शिक्षा पूर्ण होऊनही 178 भारतीय मच्छीमार पाकिस्तानच्या तुरुंगात

**मुंबई :** भारत-पाकिस्तानदरम्यान २००८ मध्ये झालेल्या 'अग्रीमेंट ऑन कॉन्स्युलर एक्सेस' या द्विपक्षीय करारानुसार शिक्षा पूर्ण झाल्यानंतर आणि संबंधित कैद्याची राष्ट्रीयता निश्चित झाल्यानंतर एका महिन्याच्या आत त्याला मायदेशी परत पाठविणे बंधनकारक आहे; मात्र या कराराच्या तरतुदींचे उल्लंघन करत पाकिस्तानने शिक्षा पूर्ण झाल्यानंतरही अनेक भारतीय मच्छीमारांना वर्षानुवर्षे तुरुंगात ठेवल्याची गंभीर बाब माहिती अधिकारातून समोर आली आहे.


# दैनिक हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com

Web portal : hinduprakashwarta.com

PRGI No.: MHMAR/25/A2358

सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी


## रोहित आणि विराटने रचला इतिहास

**मुंबई :** भारत आणि इंग्लंड यांच्यात दुसरा एकदिवसीय सामना कार्डिफ येथे सुरु आहे. इंग्लंडनं टॉस जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे. दुसऱ्या वनडेमध्ये रोहित शर्मा आणि विराट कोहली या दोघांनी ६० धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी करत नव्या विक्रमाला गवसणी दिली आहे. या भागीदारीदरम्यान विराट कोहली आणि रोहित शर्मा या दोघांनी कसोटी, वनडे आणि टी-२० या तीन फॉरमॅटमध्ये भारतासाठी आठ हजारांहून अधिक धावांची भागीदारी केल्याचा विक्रम आपल्या नावी केला आहे. या दोघांनी सौरव गांगुली आणि राहुल द्रविड, केन विल्यमसन आणि रॉस टेलर यांना मागं टाकलं.


छत्रपती संभाजीनगर ❀ गुरूवार, दि. १७ जुलै २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : ८७ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com


# द्रोणागिरी नोडमध्ये कथित बेकायदेशीर मोबाईल टॉवरचा सुळसुळाट; नागरिकांच्या आरोग्याशी खेळ थांबवणार कोण ?

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण / रायगड :** उरण तालुक्यातील द्रोणागिरी नोड परिसरात विविध ठिकाणी नियमांचे उल्लंघन करून कथित बेकायदेशीर मोबाईल टॉवर उभारले जात असल्याची गंभीर तक्रार समोर आली आहे. या टॉवरमुळे परिसरातील नागरिकांमध्ये आरोग्याविषयी चिंता वाढली असून, संबंधित यंत्रणांच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

नागरिकांचे म्हणणे आहे की, निवासी भागात मोबाईल टॉवर उभारल्यामुळे दीर्घकाळ रेडिओ-फ्रिक्वेन्सी किरणोत्सर्गाच्या संपर्कात राहावे लागते. यामुळे डोकेदुखी, झोप न लागणे, मानसिक तणाव, थकवा, एकाग्रता कमी होणे यांसारख्या तक्रारींची भीती व्यक्त केली जाते. या विषयावर जगभरात विविध अभ्यास सुरू असून, त्यामुळे निवासी भागातील टॉवर उभारणीबाबत सर्व सुरक्षा निकष आणि कायदेशीर नियमांचे काटेकोर पालन होणे अत्यावश्यक असल्याचे नागरिकांचे मत आहे.

स्थानिक नागरिकांनी या प्रकरणाची तात्काळ चौकशी करून आवश्यक परवानग्यांशिवाय उभारण्यात आलेले टॉवर त्वरित हटवावेत तसेच दोषींवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.

या संदर्भात शिवसेना द्रोणागिरी शहर प्रमुख जगजीवन भोईर यांनी सिडको प्रशासन व संबंधित शासकीय विभागाकडे अधिकृत पत्रव्यवहार करून कथित बेकायदेशीर मोबाईल टॉवरची सखोल चौकशी करण्याची, नियमांचे उल्लंघन आढळल्यास तातडीने कठोर कारवाई करण्याची आणि नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने तांत्रिक तपासणीचा अहवाल सार्वजनिक करण्याची मागणी केली आहे.

### मोबाईल टॉवर मुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका

**द्रोणागिरी परिसरात अवैध बेकायदेशीर मोबाईल टॉवर यांना कोणतेही परवानगी मिळू नये. मोबाईल टॉवर मुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला असून बेकायदेशीर टॉवर वर त्वरित कारवाई होणे अपेक्षित आहे. त्यासाठी आवश्यक ते पाठपुरावा सुरु आहे.**

**- जगजीवन भोईर, द्रोणागिरी शिवसेना शहर प्रमुख**

### विना परवानगी रस्त्यात मोबाईल टॉवर

**मोबाईल टॉवर बसवायला आलेले कर्मचारी सिडकोची परवानगी आहे असे सांगतात मात्र कागदपत्रे दाखवत नाहीत. मोबाईल टॉवर भर रस्त्यात बसवत आहेत. मोबाईल टॉवर मुळे जनता, नागरिक यांना भविष्यात मोठे दुष्परिणाम भोगावे लागणार आहे. त्यामुळे रस्त्यावर किंवा रस्त्यात कुठेही मोबाईल टॉवर बसवू नयेत अशी जनतेची मागणी आहे.**

**- शोभा भोईर, महिला सामाजिक कार्यकर्त्या, द्रोणागिरी नोड, उरण**



## थोडक्यात वार्ता

### 18 जुलैपर्यंत अनधिकृत होर्डिंग्ज न हटवल्यास फौजदारी कारवाई

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शहराच्या सौंदर्याला बाधा आणणाऱ्या आणि चौकाचौकांत धोकादायक पद्धतीने लटकणाऱ्या अनधिकृत फलकबाजीला चाप लावण्यासाठी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने आता थेट कारवाईचा बडगा उगारला आहे. महापालिका आयुक्त अमोल येडगे यांनी बेकायदेशीर जाहिरातदार, राजकीय कार्यकर्ते आणि संस्थांना कडक शब्दांत ताकीद दिली आहे. येत्या शनिवार, १८ जुलैपर्यंत शहरातील विनापरवानगी उभारलेले सर्व होर्डिंग्ज, बॅनर्स आणि पोस्टर्स संबंधितांनी स्वतःहून काढून घ्यावेत, असे स्पष्ट निर्देश आयुक्तांनी दिले आहेत. या मुदतीनंतरही जे अनधिकृत फलक शहरात दिसतील, ते मनपा स्वतः जप्त तर करेलच, पण त्याचा संपूर्ण खर्च आणि दंड संबंधित जाहिरातदाराकडून वसूल करून थेट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला जाणार आहे.

### सीएसएमआरडीएमध्ये नव्या कंत्राटी भरतीचा मार्ग मोकळा

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (सीएसएमआरडीए) कार्यक्षेत्रात येणाऱ्या गावांचा आणि झालर क्षेत्राचा सुनियोजित विकास करण्यासाठी प्रशासनाने मोठे पाऊल उचलले आहे. प्राधिकरणातील रिक्त जागांमुळे विकासकामांना खीळ बसू नये म्हणून विभागीय आयुक्त तथा सीएसएमआरडीएचे आयुक्त जी. श्रीकांत यांनी कंत्राटी पद्धतीने पदभरती करण्यास हिरवा कंदील दाखवला आहे. येत्या आठवड्यातच या भरती प्रक्रियेचा श्रीगणेशा करण्याचे आदेश त्यांनी प्रशासकीय यंत्रणेला दिले आहेत. सीएसएमआरडीएच्या कार्यालयात पार पडलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या बैठकीला सहआयुक्त अंजली धानोरकर, महानगर नियोजनकार हर्षल बाविस्कर आणि उपआयुक्त लखीचंद चव्हाण आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

### सात गावांमध्ये रास्तभाव दुकानांसाठी अर्ज प्रक्रिया सुरु

**कन्नड :** तालुक्यातील सात गावांमध्ये नवीन रास्तभाव (शिधावाटप) दुकाने मंजूर करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत जाहीरनामे प्रसिद्ध करण्यात आले असून, इच्छुक पात्र संस्था व गटांकडून ३१ जुलै २०२६ पर्यंत अर्ज मागविण्यात आले आहेत. ज्या गावांसाठी नवीन रास्तभाव दुकाने मंजूर करण्यात येणार आहेत, त्यामध्ये कविटखेडा, आंतापूर, लोहगाव, तळणेर, सोनवाडी, रोहिला आणि मोहाडी या गावांचा समावेश आहे.

### अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वार ठार; पाच दिवसांनी गुन्हा दाखल

**कन्नड :** तालुक्यातील वडगाव-नागद रस्त्यावर अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी अपघातानंतर पाच दिवसांनी कन्नड ग्रामीण पोलिस ठाण्यात अज्ञात वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मृताची ओळख विनोद बाळू सूर्यवंशी (वय ३२, रा. वडगाव, ता. कन्नड) अशी आहे. याप्रकरणी चंद्रकांत सूर्यवंशी यांनी कन्नड ग्रामीण पोलिस ठाण्यात फिर्याद दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १० जुलै रोजी रात्री सुमारे १०.२० वाजता विनोद सूर्यवंशी हे त्यांच्या ताब्यातील एमएच-२० एचडी-३७८४ क्रमांकाच्या दुचाकीवरून वडगाव-नागद मार्गाने जात असताना अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली.

# पेपरफुटी प्रकरण : शिवराज मोटेगावकरचा मोबाईल पाहताच CBI चे डोळे पांढरे!

**लातूर:** देशभरात खळबळ उडवून देणाऱ्या नीट (NEET) परीक्षा पेपरफुटी प्रकरणात आतापर्यंतचा सर्वात मोठा आणि धक्कादायक खुलासा झाला आहे. या प्रकरणातील संशयित आरोपी शिवराज मोटेगावकर याच्या जामीन अर्जाला तीव्र विरोध करताना केंद्रीय अन्वेषण विभागाने (CBI) न्यायालयासमोर तपासातील असा काही कच्चाचिठ्ठा मांडला आहे, ज्यामुळे संपूर्ण शिक्षण व्यवस्था हादरून गेली आहे. नीटचा पेपर काढणाऱ्यांनी चक्क ५ लाख रुपयांच्या बदल्यात केमिस्ट्री (रसायनशास्त्र) विषयाचे प्रश्न फोडल्याचे सीबीआयच्या तपासात अधिकृतपणे उघड झाले आहे.

सीबीआयने कोर्टाला दिलेल्या माहितीनुसार, शिवराज मोटेगावकर याने या संपूर्ण पेपरफुटी प्रकरणातील मुख्य सूत्रधार पी. व्ही. कुलकर्णी याच्याकडून हे गोपनीय प्रश्न मिळवले होते. या




प्रश्नांच्या खरेदी-विक्रीसाठी ५ लाख रुपयांची मोठी देवाणघेवाण झाली होती. मोटेगावकरचा मुलगा हा कुलकर्णी यांच्या काही ठराविक विद्यार्थ्यांच्या कोचिंग सेंटरचा विद्यार्थी होता. याच ओळखीचा आणि संबंधांचा गैरफायदा घेत कोचिंग सेंटरच्या माध्यमातून ही प्रश्नपत्रिका मिळवण्यात आली होती. तपासादरम्यान सीबीआयने जेव्हा शिवराज मोटेगावकरचा मोबाईल फोन जप्त करून त्याची फॉरेन्सिक तपासणी केली, तेव्हा त्यात धक्कादायक पुरावे हाती लागले. मोटेगावकरच्या मोबाईलमध्ये केमिस्ट्री विषयाचे तब्बल १३२ हस्तलिखित प्रश्न आढळून आले. इतकेच नाही तर मूळ प्रश्नपत्रिकेचे ३६ थेट फोटो (इमेजेस) देखील त्याच्या मोबाईलमध्ये जप्त करण्यात आले आहेत.

### 132 प्रश्नांपैकी चक्क 111 प्रश्न हे प्रश्नपत्रिकेत 'जसेच्या तसे'

**या प्रकरणातील सर्वात गंभीर आणि सीबीआयला चक्रावून टाकणारी बाब म्हणजे, मोटेगावकरच्या फोनमध्ये सापडलेल्या १३२ प्रश्नांपैकी चक्क १११ प्रश्न हे प्रत्यक्ष नीट परीक्षेच्या मुख्य प्रश्नपत्रिकेत 'जसेच्या तसे' आले होते! यावरून हा पेपरफुटीचा कट किती अचूक आणि सुनियोजित पद्धतीने रचला गेला होता, हे सीबीआयने न्यायालयासमोर सिद्ध केले आहे.**

## दैवशालाच्या कृत्यानं धाराशिव हादरलं, त्याच्यासाठी पतीचाच काटा काढला, पण...

**धाराशिव:** कुमाळवाडी शिवारात झालेल्या निर्घृण खुनाच्या प्रकाराने धाराशिव हादरलं होतं. पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत अवघ्या काही तासांत गुन्हाच्या छडा लावला. पत्नीनेच आपल्या प्रियकराच्या मदतीने पतीचा काटा काढल्याचे तपासातून पुढे आहे. या भयंकर प्रकाराने धाराशिव परिसरात खळबळ उडाली असून आरोपी पत्नीसह, प्रियकर आणि त्याच्या साथीदाराला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत.

13 जुलै रोजी कुमाळवाडी शिवारात एकाचा रक्ताच्या थारोळ्यात पडलेला मृतदेह नागरिकांना आढळला. त्यांनी तातडीने याबाबत पोलिसांना माहिती दिली. धाराशिव ग्रामीणचे पोलीस निरीक्षक वसुदेव मोरे आणि त्यांच्या सगकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांना मृतदेहाच्या शेजारी एक दुचाकी उभी असल्याचे दिसले. त्यांनी तातडीने दुचाकीच्या नंबरवरूनच मालकाचे नाव काढले. त्यावरून ही मृत व्यक्ती येदशी येथील दगडू देशमुख (वय 40-45) असल्याचे स्पष्ट झाले. दगडू देशमुख यांच्या अंगावर गंभीर जखमा असल्याने त्यांचा खून झाला असल्याचा पोलिसांना संशय होता. त्यामुळे घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तपासाला वेग दिला. घटनेचे गांभीर्य ओळखून उपविभागीय पोलीस अधिकारी राऊत आणि गुन्हे शाखेचे पोलीस निरीभक वोन पवार यांनी घटनास्थली जात पाहणी केली.

मिळालेल्या माहितीनुसार, मृत दगडू देशमुख यांच्या पत्नीचं दुसऱ्यासोबतच जुळंल होतं. या संशयावरून पोलिसांनी बालाजी महादेव पायघन (रा. पांगरी, ता. बार्शी) याचा शोध सुरू केला. तेव्हा तो मेहुण्यासोबत पुण्याला गेल्याचे समजले. यावरून धाराशिव पोलिसांनी तातडीने पुणे पोलिसांसोबत संपर्क साधला. तसेच आरोपी बालाजी पायघन आणि त्याचा साथीदार सोमनाथ सातनाक यांना ताब्यात घेतले.

## शेळ्यांना घेऊन गेली पण घरी परतलीच नाही, विहिरीत सापडला मृतदेह

**सोलापूर :** जवळील आनंदनगर तांडा परिसरातून दुर्दैवी घटना समोर आली आहे. शेळ्यांना पाणी पाजण्यासाठी गेलेल्या अवघ्या ११ वर्षांच्या चिमुरडीचा विहिरीत पाय घसरून पडल्याने पाण्यात बुडून मृत्यू झाला. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत असून आनंदनगर तांड्यावर शोककळा पसरली आहे.

शेळ्यांना पाणी पाजताना घडला काळजाचा थरकाप

इंदिया रामजी राठोड (वय ११ वर्षे) असे या दुर्घटनेत जीव गमावलेल्या निष्पाप चिमुरडीचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, इंदिया राठोड ही नेहमीप्रमाणे आपल्या शेळ्या राखण्यासाठी घराबाहेर पडली होती. दिवसभर शेळ्या चारल्यानंतर, संध्याकाळच्या सुमारास ती शेळ्यांना पाणी पाजण्यासाठी आनंदनगर तांडा परिसरातील एका विहिरीजवळ घेऊन गेली.

## 26 वर्षांची महिला पोलीस, सहकाऱ्यानंच पाठलाग केला अन्...

**सोलापूर :** 'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' या ब्रीद वाक्याचा अर्थ म्हणजे सज्जनांचे रक्षण आणि दुर्जनांचा विनाश होय. पण याच ब्रीद वाक्याला काळीमा फासणारी घटना सोलापुरात घडली आहे. सोलापूर ग्रामीण पोलिस मुख्यालयात कार्यरत असलेल्या एका 26 वर्षीय महिला पोलिस अंमलदाराचा प्रत्यक्षपणे आणि मोबाईलद्वारे पाठलाग करून, अश्लील मेसेज पाठवून विनयभंग केल्याप्रकरणी एका पोलिस नाईक विरुद्ध जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे सोलापूर पोलिस दलात मोठी खळबळ उडाली आहे. विनायक सुर्यवंशी (नेमणूक- पोलिस मुख्यालय, सोलापूर ग्रामीण) असे गुन्हा दाखल झालेल्या पोलिस नाईक आरोपीचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिला पोलिस अंमलदार या सोलापूर ग्रामीण पोलिस मुख्यालय वस्तीगृह येथे राहतात. 21 डिसेंबर 2025 ते 15 जुलै 2026 या कालावधीत, महिला पोलिस अंमलदार या कर्तव्यावर असताना तसेच त्यांच्या राहत्या घरी असताना, आरोपी पोलिस नाईक विनायक सुर्यवंशी याने त्यांचा प्रत्यक्ष आणि मोबाईलद्वारे सातत्याने पाठलाग केला. एवढेच नव्हे तर, आरोपीने त्यांना मोबाईलवर अत्यंत अश्लील मेसेज पाठवून त्यांच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले. या त्रासाला कंटाळून अखेर पीडित महिला पोलिस अंमलदाराने स्वतः जेलरोड पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार नोंदवली.

पीडितेच्या फिर्यादीवरून जेलरोड पोलिस ठाण्यात आरोपी विनायक सुर्यवंशी याच्याविरुद्ध BNS (भारतीय न्याय संहिता) कलम 75 आणि 78 अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिस उपआयुक्त प्रितम यावलकर यांनी तातडीने जेलरोड पोलिस ठाण्याला भेट दिली. या प्रकरणाचा पुढील तपास जेलरोड पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक पाटील हे करत आहेत.

## कच्च्या तेलाच्या किमती भडकल्या, सरकारने एका रात्रीत घेतला 'हा' मोठा निर्णय; सर्वसामान्यांचे टेन्शन वाढणार?

**नवी दिल्ली :** अमेरिका-इराण युद्धाच्या वाढत्या तीव्रतेमुळे मध्य-पूर्वेतील तणाव वाढला आहे. या नव्याने सुरू झालेल्या संघर्षामुळे कच्च्या तेलाच्या किमतीही वाढल्या आहेत आणि तेलाच्या वाढत्या किमतींच्या पार्श्वभूमीवर, भारत सरकारने पेट्रोल आणि डिझेलबाबत एक मोठा निर्णय घेतला आहे. मोदी सरकारने डिझेल आणि विमान इंधनाच्या (एटीएफ) निर्यातीवरील विंडफॉल टॅक्समध्ये प्रति लिटर 7 रुपयांपर्यंत लक्षणीय वाढ केली आहे. कच्च्या तेलाच्या किमतीत झालेल्या वाढीमुळे कर वाढवण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे सरकारी आदेशात म्हटले आहे. बुधवारी, मोदी सरकारने पेट्रोलवरील कर कमी करून डिझेल आणि विमान इंधनाच्या (एटीएफ) निर्यातीवरील विंडफॉल टॅक्स वाढवला. हा निर्णय गुरुवार (16 जुलै) पासून लागू झाला आहे. दर 15 दिवसांनी होणाऱ्या आढाव्याचा हा एक भाग आहे.

अर्थ मंत्रालयाच्या अधिसूचनेनुसार, पेट्रोलवरील विंडफॉल टॅक्स (अपघात कर) प्रति लिटर ₹2.5 पर्यंत कमी करण्यात आला आहे. तो पूर्वी ₹4 होता. डिझेलवरील कर प्रति लिटर ₹8.5 वरून ₹15.5 पर्यंत वाढवण्यात आला आहे. एटीएफवरील विंडफॉल टॅक्स प्रति लिटर ₹7.5 वरून ₹14.5 पर्यंत वाढवण्यात आला आहे. याचा सर्वसामान्य जनतेवर परिणाम होणार नाही.

चिंताजनक जागतिक परिस्थिती आणि वाढत्या कच्च्या तेलाच्या किमतींमुळे हा कर पूर्वी अनेक वेळा कमी करण्यात आला आहे. जुलैमध्ये, जेव्हा अमेरिका-इराण युद्ध काही काळासाठी शांत झाले होते, तेव्हा सरकारने पेट्रोल निर्यातीवरील विंडफॉल टॅक्स वाढवला होता, तर डिझेल आणि एटीएफवरील कर कमी केला होता. आता, 16 जुलैपासून तो पुन्हा वाढवण्यात आला आहे.

पेट्रोल आणि डिझेलवरील कर वाढवण्याच्या या निर्णयामुळे सर्वसामान्य माणसासाठी पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीत बदल होईल का? तर याचे उत्तर नाही आहे. कारण विंडफॉल टॅक्स हा सरकारद्वारे कंपन्या किंवा उद्योगांवर लादलेला एक अतिरिक्त कर आहे, ज्याचा उद्देश देशांतर्गत बाजारात इंधनाची उपलब्धता सुनिश्चित करणे आणि निर्यातदारांना आंतरराष्ट्रीय किमतींचा गैरफायदा घेण्यापासून रोखणे हा आहे.

## विनायक राऊत यांच्या अडचणीत वाढ; भोंदू बाबा फिरोज शेखच्या पोलिस कोठडीत वाढ

**मुंबई :** गिरिजा राऊत यांनी दिलेल्या तक्रारीवरून विनायक राऊत आणि गीतेश राऊत यांच्या कुटुंबाच्या अडचणी दिवसेंदिवस वाढताना दिसत आहेत. याप्रकरणी विनायक राऊत यांनी न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज दाखल केला होता. मात्र, कोर्टाने अर्ज फेटाळला. आता या अर्जावर मुख्य सुनावणी 23 जुलै रोजी होणार आहे. तोपर्यंत कोर्टाने विनायक राऊत यांना कोणतेही अंतरिम संरक्षण दिलेले नाही. तर दुसरीकडे या प्रकरणातील अटक आरोपी भोंदू बाबा फिरोज शेख बाबाला तिसऱ्यांदा ठाणे कोर्टात हजर करण्यात आले. फिरोज शेखच्या पोलिस कोठडीत दोन दिवसांची वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे विनायक राऊत यांचे पाय आणखी खोलात गेले आहेत. सुनावणीदरम्यान पोलिसांनी कोर्टाकडे आरोपी फिरोज शेखच्या कोठडीत आणखी दोन दिवसांची वाढ करण्याची मागणी केली. फिरोज शेख आणि त्याचा कथित साथीदार राम यल्लप्पा वडार यांची समोरासमोर बसवून चौकशी करणे अत्यावश्यक असल्याचे पोलिसांनी कोर्टात सांगितले. या संयुक्त चौकशीतून प्रकरणाशी संबंधित अनेक महत्त्वाचे धागेदोरे आणि नवीन माहिती समोर येण्याची शक्यता असल्याचा दावा पोलिसांनी केला.

## "शाल जोडे"




# जालन्यात 'दृश्यम' स्टाईल मर्डर मिस्ट्रीचा उलगडा! 'डीएनए'ने शोधला मारेकरी

**जालना :** गुन्हेगारी जगतात पुरावे नष्ट करण्यासाठी कितीही चलाखी केली, तरी कायद्याचे हात आरोपीच्या गळ्यापर्यंत पोहोचतातच, याचा प्रत्यय आणून देणारी एक थक्क करणारी घटना जालन्यातून समोर आली आहे. गेल्या वर्षभरापासून बेपत्ता असलेल्या एका तरुणाच्या खुनाचा अत्यंत गुंतागुंतीचा तपास लावण्यात कदीम जालना पोलिसांना यश आले आहे.

उसने दिलेले पैसे परत मागितल्याच्या रागातून मित्रानेच आपल्या मित्राचा गेम करून त्याचा मृतदेह नदीत फेकून दिला होता. अखेर एका डीएनए अहवालामुळे या थंड पडलेल्या प्रकरणाला वाचा फुटली असून पोलिसांनी मुख्य आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रकरणातील मृत तरुण ऋषीकेश पवार याने त्याचा मित्र अविनाश वाघमारे याला सुमारे 1 लाख रुपये उसने दिले होते. ऋषीकेश या पैशांसाठी अविनाशकडे वारंवार तगादा लावत होता. पैशांच्या याच मागणीला कंटाळून अविनाशने ऋषीकेशचा काटा काढण्याचा कट रचला. आरोपी अविनाशने ऋषीकेशला उसने पैसे परत देण्याच्या आणि पार्टी करण्याच्या बहाण्याने बठाण शिवारातील एका शेतात नेले. तिथे दोघांनी मिळून दारू प्यायली. दारूच्या नशेत पुन्हा पैशांवरून त्यांच्यात जोरदार वाद सुरू झाला. वाद विकोपाला गेल्यानंतर आरोपी अविनाशने आधी हाताने आणि नंतर नायलॉनच्या रुमालाने ऋषीकेशचा गळा आवळून त्याला जागीच ठार केले.

गुन्हा केल्यानंतर कोणताही पुरावा मागे उरणार नाही याची काळजी आरोपीने घेतली. त्याने ऋषीकेशचा मृतदेह स्वतःच्या गाडीत टाकला आणि तिथून थेट नेऊन तो दुधना नदीच्या पात्रात फेकून दिला. यानंतर त्याने ऋषीकेश कधी भेटलाच नसल्याचा आव आणला. या प्रकरणी 22 सप्टेंबर 2025 रोजी ऋषीकेश पवार हा बेपत्ता झाल्याची तक्रार तालुका जालना पोलीस ठाण्यात नोंदवण्यात आली होती.

कदीम जालना पोलीस ठाण्यात एका वेगळ्याच गुन्ह्याचा तपास सुरू असताना पोलिसांना अत्यंत गोपनीय माहिती मिळाली. माळीपुरा येथील अविनाश वाघमारे याने सप्टेंबर 2025 मध्ये त्याचा मित्र ऋषीकेश पवार याची हत्या केल्याची टीप पोलिसांना मिळाली. कदीम जालना पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवून संशयित अविनाश वाघमारेला ताब्यात घेतले आणि पोलिसी खाक्या दाखवताच त्याने आपल्या गुन्ह्याची कबुली दिली. आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली असली, तरी मृतदेहाशिवाय गुन्हा सिद्ध करणे कठीण होते. यासाठी पोलीस अधीक्षक तेघबीरसिंग संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली एक विशेष तपास पथक स्थापन करण्यात आले.

बेवारस मृतदेहाचा शोध

पथकाने दुधना नदी परिसरातील सर्व पोलीस ठाण्यांकडून बेवारस मृतदेहांची माहिती मागवली. तेव्हा अंबड पोलीस ठाण्याच्या हद्दीत सप्टेंबर-ऑक्टोबर 2025 दरम्यान एक बेवारस मृतदेह सापडल्याचे समजले. याचे डीएनए नमुने पोलिसांनी सुरक्षित जतन करून ठेवले होते.

### आईचा डीएनए मॅच झाला

**पोलिसांनी तातडीने ऋषीकेश पवार यांच्या आईचे रक्ताचे नमुने घेऊन ते प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवले. प्रयोगशाळेने अवघ्या 24 तासांत आपला अहवाल सादर केला. या अहवालात तो बेवारस मृतदेह ऋषीकेश पवार याचाच असल्याचे आणि संबंधित महिला त्याची माता असल्याचे स्पष्ट झाले.**

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# संपादकीय

## संस्थाचालकांचे वाद आणि विद्यार्थ्यांचा आक्रोश

बीड जिल्ह्यातील परळी हा राजकीय दृष्ट्या अत्यंत संवेदनशील, वजनदार आणि राज्याच्या दोन दिग्गज नेत्यांचा हक्काचा मतदारसंघ म्हणून ओळखला जातो. मात्र, याच मतदारसंघातून शिक्षणाची जी विदारक आणि धक्कादायक अवस्था समोर आली आहे, ती संपूर्ण राज्याला विचार करायला लावणारी आहे. सन १९४१ च्या काळातील, परळी शहराची ऐतिहासिक आणि शैक्षणिक ओळख असलेल्या वैद्यनाथ विद्यालयाचा झालेला बोजवारा हा केवळ एका शाळेचा पराभव नाही, तर तो संपूर्ण शिक्षण व्यवस्थेच्या ढिसाळपणाचा ढळढळीत पुरावा आहे. गेल्या महिनाभरापासून वर्गात शिकवण्यासाठी शिक्षकच येत नसल्याने संतप्त झालेल्या साडेचारशे विद्यार्थ्यांनी वर्गांवर बहिष्कार टाकून शाळेच्या प्रांगणात आक्रोश आंदोलन छेडणे, ही अत्यंत दुर्दैवी आणि शरमेची बाब आहे. "शिक्षण आमच्या हक्काचं" अशा घोषणा देण्याची वेळ जर शाळकरी मुलांवर येत असेल, तर आपण पुरोगामी महाराष्ट्रात कोणत्या दिशेने चाललो आहोत, हा गंभीर प्रश्न निर्माण होतो. या ऐतिहासिक शाळेतील अनागोंदी कारभारामागे संस्थाचालकांचे आपापसातील हेवेदावे, शिक्षकांचे चुकीचे समायोजन आणि वेतनाचा प्रलंबित प्रश्न ही मुख्य कारणे असल्याचे समोर आले आहे. शाळेतील ४१ शिक्षकांपैकी तब्बल २५ शिक्षक अतिरिक्त ठरवले जाणे आणि केवळ १६ शिक्षकांवर संपूर्ण शाळेची धुरा असणे, हेच मुळात नियोजनशून्यतेचे लक्षण आहे. त्यातही धक्कादायक बाब म्हणजे, या १६ पैकी केवळ काहीच शिक्षक हजर असतात आणि उर्वरित शिक्षक कुठे आहेत, याची माहिती खुद्द उपमुख्याध्यापकांकडेही नसते. गेल्या सहा महिन्यांपासून शिक्षकांचे पगार रखडल्यामुळे त्यांनी अध्यापनाऐवजी आंदोलनाचा मार्ग निवडला आहे. संस्थाचालकांचा वाद, शिक्षकांचे पगार आणि मुख्याध्यापक पदाचा प्रलंबित गोंधळ या सर्व व्यवस्थेच्या भांडणात निष्पाप विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य मात्र अक्षरशः उघड्यावर आले आहे. राज्य सरकार एकीकडे डिजिटल शाळा आणि शिक्षणावर कोट्यवधी रुपयांचा भरमसाठ खर्च करत असल्याचे दावे करते, मात्र जबाबदार मंत्र्यांच्याच मतदारसंघात अशी 'अंधेर नगरी' पाहायला मिळत आहे. प्रार्थना संपल्यानंतर एकही शिक्षक वर्गात न आल्यामुळे इयत्ता पाचवी ते दहावीचे विद्यार्थी ज्या पद्धतीने मैदानात उतरले, त्याने शिक्षण विभागाच्या झोपलेल्या प्रशासनाला जागे केले पाहिजे. पालकांनी आपल्या पाल्यांच्या उज्वल भविष्यासाठी त्यांना शाळेत पाठवायचे की हक्काच्या शिक्षणासाठी रस्त्यावर आंदोलन करायला? हा प्रश्न आता उपस्थित होत आहे. शिक्षण विभागाने या प्रकरणात तातडीने हस्तक्षेप करून संस्थाचालकांच्या वादावर तोडगा काढावा, शिक्षकांचे प्रश्न सोडवावेत आणि विद्यार्थ्यांना त्यांचे हक्काचे शिक्षक मिळवून द्यावेत. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष धोक्यात आणणाऱ्या जबाबदार घटकांवर कठोर कारवाई होणे हीच आता काळाची गरज आहे.

# नाव कमावणं कठीण, पण गमावणं क्षणाचं...! आयुष्यभराच्या प्रतिमेला एका चुकीची किंमत

"आयुष्यभर नाव कमावलं आणि म्हातारपणी गमावलं, अशी गत झाली ह्या माणसाची." हे वाक्य केवळ एका व्यक्तीच्या आयुष्याचं वर्णन नाही, तर सार्वजनिक जीवन जगणाऱ्या प्रत्येकासाठी एक गंभीर इशारा आहे. नेता, अधिकारी, साहित्यिक, कलाकार, समाजसेवक किंवा कोणतीही सार्वजनिक व्यक्ती असो, आयुष्यभराच्या कष्टाने निर्माण झालेली प्रतिमा, लोकांचा विश्वास आणि समाजाचा आदर एका चुकीच्या निर्णयामुळे क्षणार्धात कोसळू शकतो. प्रतिष्ठा उभारण्यासाठी अनेक दशके खर्ची पडतात, पण ती गमावण्यासाठी अनेकदा एकच चुकीचं पाऊल पुरेसं ठरतं. आज सामाजिक माध्यमांच्या युगात प्रत्येक व्यक्तीच न्यायाधीश झाली आहे. प्रत्येक कृतीचं विश्लेषण होतं, प्रत्येक विधानाचं परीक्षण होतं आणि प्रत्येक निर्णयावर लोकमत तयार होतं. त्यामुळे सार्वजनिक जीवनातील प्रत्येक शब्द आणि प्रत्येक कृती अधिक जबाबदारीने करावी लागते. आयुष्यभर जपलेली विश्वासार्हता शेवटच्या टप्प्यावर मलीन होऊ नये, यासाठी विवेक, संयम आणि नैतिकता हेच सर्वात मोठे आधारस्तंभ ठरतात.

जीवनात यशस्वी होण्यासाठी केवळ बुद्धिमत्ता किंवा प्रतिभा पुरेशी नसते, तर त्यासाठी चारित्र्याची साथही तितकीच आवश्यक असते. पैसा, पद, सत्ता किंवा प्रसिद्धी माणसाला मोठं करत नाहीत, त्याच्या निर्णयातील प्रामाणिकपणा, मूल्यांप्रती असलेली निष्ठा आणि समाजाविषयीची जबाबदारी त्याचं खरं मोठेपण सिद्ध करतात. म्हणूनच इतिहासात अनेक व्यक्ती त्यांच्या कर्तृत्वाइतक्याच त्यांच्या अखेरच्या चुकीमुळेही लक्षात राहिल्या आहेत. म्हातारपण हे अनुभव, शहाणपण आणि मार्गदर्शनाचं वय मानलं जातं. या वयात समाजाला दिशा देण्याची अपेक्षा असते. परंतु जर याच टप्प्यावर अहंकार, स्वार्थ, सत्तेची लालसा किंवा चुकीच्या लोकांची संगत माणसाला भरकटवत असेल, तर त्याने आयुष्यभर कमावलेली विश्वासार्हता एका क्षणात धुळीस मिळते. म्हणूनच म्हणतात, "उतारवयातील संयम हा आयुष्यभराच्या कर्तृत्वाचा खरा रक्षक असतो."

आज अनेक क्षेत्रांत अशी उदाहरणे पाहायला मिळतात. काही राजकारणी आयुष्यभर जनतेसाठी काम करतात, पण शेवटच्या काळात सत्तेच्या मोहापायी तत्त्वांशी तडजोड करतात. काही अधिकारी प्रामाणिक सेवेनंतर निवृत्तीच्या उंबरठ्यावर भ्रष्टाचाराच्या आरोपात अडकतात. काही साहित्यिक किंवा समाजसुधारक स्वतःच्या विचारांशी विसंगत भूमिका घेतात आणि त्यांच्या चाहत्यांचाच विश्वास गमावतात. समाज त्यांच्या आयुष्यभराच्या योगदानाचा विसर पडू देत नाही, मात्र त्यांच्या शेवटच्या चुकीची सावली त्यांच्या संपूर्ण कर्तृत्वावर पडते. चुका होणं मानवी स्वभावाचा भाग आहे. मात्र चूक मान्य करण्याचं धैर्य आणि स्वतःमध्ये सुधारणा करण्याची तयारी हेच खऱ्या मोठेपणाचं लक्षण आहे. प्रतिष्ठा टिकवायची असेल तर सतत आत्मपरीक्षण आवश्यक आहे. स्वतःभोवती केवळ स्तुती करणारी माणसं गोळा करणारा व्यक्ती वास्तवापासून दूर जातो. टीका स्वीकारण्याची वृत्ती आणि आवश्यक तेव्हा नम्रपणे माघार घेण्याची तयारीच दीर्घकाळ सन्मान टिकवून ठेवते.

समाजानेही व्यक्तीचं मूल्यमापन करताना संतुलित भूमिका घ्यायला हवी. एका चुकीमुळे संपूर्ण आयुष्य नाकारण्याची घाई योग्य नाही. एखाद्या व्यक्तीच्या संपूर्ण योगदानाचा, परिस्थितीचा आणि भूमिकेचाही विचार व्हायला हवा. पण त्याचवेळी कोणतीही चूक केवळ व्यक्ती मोठी आहे म्हणून दुर्लक्षितही होता कामा नये. नैतिकतेचं माप सर्वांसाठी समान असलं पाहिजे. आजच्या तरुण पिढीनेही या वास्तवातून महत्त्वाचा धडा घ्यायला हवा. करिअर, पैसा आणि प्रसिद्धी मिळवणं आवश्यक आहे; पण त्याहून महत्त्वाचं म्हणजे विश्वास कमावणं. विश्वास हा बँकेतील ठेवीसारखा असतो, वर्षानुवर्षे जमा करावा लागतो पण एका चुकीच्या व्यवहाराने क्षणात संपतो. म्हणून प्रत्येक निर्णय घेताना त्याचा आपल्या प्रतिमेवर आणि भविष्यातील विश्वासावर काय परिणाम होईल, याचाही विचार व्हायला हवा.

सार्वजनिक जीवनातील व्यक्तींनी विशेषतः लक्षात ठेवावं की त्यांचं प्रत्येक पाऊल समाजासाठी संदेश ठरत असतं. त्यांची वाणी, वर्तन आणि निर्णय यावर अनेकांची श्रद्धा असते. त्यामुळे वैयक्तिक लाभापेक्षा सार्वजनिक विश्वास अधिक मौल्यवान असतो. एकदा हा विश्वास तुटला, तर कोणतंही पद, कोणतीही सत्ता किंवा कोणतीही संपत्ती त्या नुकसानीची भरपाई करू शकत नाही. माणसाचं खरं यश त्याने किती संपत्ती कमावली यावर ठरत नाही, तर त्याने किती चांगल्या आठवणी मागे ठेवल्या, किती स्वच्छ प्रतिमा निर्माण केली आणि किती माणसं आपल्या कर्तृत्वाने जोडली यावर ठरतं. आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यावर लोकांनी "हा माणूस शेवटपर्यंत तत्त्वांशी प्रामाणिक राहिला," असं म्हणणं हीच सर्वात मोठी कमाई असते.

आज समाजाला पदापेक्षा प्रामाणिकपणा, प्रसिद्धीपेक्षा विश्वास आणि यशापेक्षा चारित्र्य जपणारी माणसं हवी आहेत. कारण नाव कमावणं हे परिश्रमाचं फळ असतं, पण नाव टिकवणं ही आयुष्यभराची तपश्चर्या असते. प्रतिष्ठा हा मुकुट नसतो की हवा तसा घालता किंवा काढता येईल, ती आरशासारखी असते. एकदा तडा गेला की प्रतिबिंब कायमच बदलून जातं. काळ कोणालाही माफ करत नाही. तो प्रत्येकाच्या कर्तृत्वाची नोंद ठेवतो आणि प्रत्येक चुकीचाही हिशोब मांडतो. त्यामुळे आयुष्यभर जपलेली प्रतिमा शेवटच्या श्वासापर्यंत तितक्याच प्रामाणिकपणे जपावी लागते. इतिहास माणसाच्या संपत्तीची नव्हे, तर त्याच्या चारित्र्याची साक्ष देतो. सत्ता, संपत्ती आणि प्रसिद्धी क्षणभंगुर असतात, पण सचोटी, मूल्यनिष्ठा आणि समाजाच्या मनात निर्माण झालेला विश्वास हेच माणसाच्या आयुष्याचं खरं भांडवल असतं.

आज प्रत्येक सार्वजनिक व्यक्तीने स्वतःला एक प्रश्न विचारण्याची गरज आहे. आपण पदासाठी जगतो आहोत की प्रतिष्ठेसाठी? कारण पद निवृत्तीनंतर संपतं, पण प्रतिष्ठा पिढ्यान्‌पिढ्या जिवंत राहते. आयुष्याच्या संध्याकाळी मागे वळून पाहताना संपत्तीपेक्षा सन्मान, पदापेक्षा प्रतिष्ठा आणि लोकप्रियतेपेक्षा लोकांचा विश्वासच अधिक मौल्यवान वाटतो. म्हणून प्रत्येक कृती, प्रत्येक निर्णय आणि प्रत्येक शब्द हा आपल्या चारित्र्याचा आरसा असला पाहिजे. शेवटी एकच "नाव कमावण्यासाठी आयुष्य खर्ची पडतं, पण नाव गमावण्यासाठी एक क्षण पुरेसा असतो". त्यामुळे कर्तृत्वापेक्षा चारित्र्य मोठं आणि प्रसिद्धीपेक्षा विश्वास अधिक मौल्यवान असतो. कारण इतिहास यशस्वी माणसांची नव्हे, तर विश्वासार्ह माणसांचीच कायम आठवण ठेवतो."

- प्रविण बागडे, नागपूर
भ्रमणध्वनी : 9923620919

# राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासाठी तळमळीने काम करणाऱ्या चेहऱ्याला जिल्हाध्यक्ष करणार : शशिकांत शिंदे

## हिंगोलीतील राष्ट्रवादी भवन येथे जिल्हा कार्यकर्ता मेळावा संपन्न

**हिंगोली :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) आगामी काळात अधिक सक्षम आणि जनाधार असलेली संघटना उभी करण्यासाठी राज्यभरात संघटन विस्तारावर भर देणार असून, नव्या कार्यकर्त्यांना संधी देत प्रत्येक गाव आणि प्रत्येक बूथपर्यंत पक्षाची ताकद पोहचविण्यात येणार आहे, असे प्रतिपादन पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी केले.

नाईक नगर परिसरातील राष्ट्रवादी भवनात गुरुवारी 16 जूलै रोजी आयोजित पक्षाच्या पदनियुक्ती व संघटन विस्तार बैठकीत ते बोलत होते. यावेळी माजी मंत्री जयप्रकाश दांडेगावकर माजी आमदार सुनील भुसारा जिल्हा प्रभारी पंकज बोराडे प्रदेश उपाध्यक्ष भीमराव हत्तीआंबिरे माजी आमदार विजय गव्हाणे यांची उपस्थिती होती




पुढे बोलतांना शशिकांत शिंदे म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्ष हा सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरून संघर्ष करणारा पक्ष आहे. आगामी काळात जनतेच्या प्रश्नांवर अधिक आक्रमक भूमिका घेतली जाईल. प्रत्येक कार्यकर्ता हा पक्षाची खरी ताकद असून, बूथस्तरापासून संघटना मजबूत करण्यासाठी व्यापक अभियान राबविले जाणार आहे. हिंगोली जिल्हा हा शरद पवार यांच्यावर प्रेम करणारा जिल्हा असून, पूर्वीप्रमाणेच पुन्हा एकदा येथे पक्षाचे मजबूत संघटन उभारण्यात येईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला व येणाऱ्या काळात होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत आपल्या पक्षाचे उमेदवार निवडून येण्यासाठी गाव तिथे शाखा करून

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा झेंडा जिल्ह्यात फडकला पाहिजे व रिक्त झालेल्या जिल्हाध्यक्ष पदावर पक्षांसाठी प्रामाणिक काम करणाऱ्या चेहऱ्याला हिंगोली जिल्हाध्यक्ष पदाची संधी या आठवड्यात भरात देऊन त्यानंतर महिन्यात मोठा पक्षाचा मेळावा घेणारअसल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे हिंगोली जिल्हा उपाध्यक्ष रवी शिंदे हिंगोली विधानसभा अध्यक्ष बंडू मुटकुळे कळमनुरी विधानसभा अध्यक्ष गणेशराव गडदे माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष मनीष आखरे युवक जिल्हाध्यक्ष सोनू चव्हान माधव कोरडे हिंगोली तालुकाध्यक्ष धीरज काकडे अल्पसंख्याक आघाडी आयुब पठाण सामाजिक न्याय विभाग जिल्हाध्यक्ष भास्कर कुन्हे वसमत माजी तालुकाध्यक्ष बाबुराव दळवी मोईन बागवान राजू भाबळे प्रभू शिंदे रमेश जाधव यांच्यासह जिल्ह्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रत्येक बूथवर पक्ष मजबूत करणार...

प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी कार्यकर्त्यांना संबोधित करताना पक्षाची ताकद बूथस्तरावर वाढविण्यावर विशेष भर दिला. प्रत्येक गाव, प्रत्येक बूथ आणि प्रत्येक कार्यकर्ता हा पक्षाचा आधारस्तंभ असल्याचे सांगत आगामी काळात होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संघटन अधिक सक्षम करण्यासाठी सर्व पदाधिकाऱ्यांनी सक्रियपणे काम करण्याचे आवाहन त्यांनी केले व बूथ तिथे कार्यकर्ता गाव तिथे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची शाखा सुरू करण्यासाठी प्रयत्न करा असेही त्यांनी सांगितले.

# मुरुम तस्करांच्या ट्रॅक्टरला तहसीलदारांचे 'अभय'?

## खुलताबाद तालुक्यात 60 हजारांच्या कथित 'सेटिंग'ची चर्चा

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** जागतिक कीर्तीच्या ऐतिहासिक वेरूळ लेणी परिसरात सध्या शासकीय महसूल बुडवणाऱ्या अवैध गौण खनिज माफियांनी उच्छाद मांडला आहे. अशातच, कायद्याचे रक्षण करण्याची जबाबदारी असलेल्या खुलताबाद तहसीलदारांच्या एका संशयास्पद भूमिकेमुळे संपूर्ण तालुक्यात उलटसुलट चर्चांना उधाण आले आहे. वेरूळ परिसरातून बेकायदेशीरपणे मुरमाचा उपसा करून वाहतूक करणारा एक ट्रॅक्टर खुद्द तहसीलदारांनी कारवाई करत पकडला खरा, पण पुढील कायदेशीर कारवाई करण्याऐवजी तब्बल ६० हजार रुपयांची गुप्त 'तडजोड' करून तो वाहनचालक आणि ट्रॅक्टर परस्पर सोडून देण्यात आल्याचा धक्कादायक आरोप आता समोर येत आहे. या कथित आर्थिक व्यवहारामुळे प्रामाणिक नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत असून प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. वेरूळ लेणी आणि आसपासचा परिसर हा अत्यंत संवेदनशील आणि संरक्षित मानला जातो. मात्र, मागील काही काळापासून या भागातून छुप्या पद्धतीने डोंगर पोखरून मुरूम आणि इतर गौण खनिजांची अवैध वाहतूक सुरू आहे. तहसीलदारांनी स्वतः ही कारवाई केली असल्याने नागरिकांना प्रशासनाकडून मोठ्या दंडात्मक कारवाईची अपेक्षा होती. जप्त केलेले वाहन अधिकृतपणे खुलताबाद तहसील कार्यालयात जमा करणे आवश्यक होते. परंतु, तसे न करता केवळ पडद्यामागे झालेल्या अर्थपूर्ण तडजोडीनंतर हे वाहन सोडून देण्यात आल्याचा संशय बळावला आहे. जर थेट जबाबदार महसूल अधिकारीच अशा प्रकारे तस्करांशी हातमिळवणी करत असतील, तर शासकीय तिजोरी लुटणाऱ्या या भू-माफियांचे धाडस आणखी वाढेल, अशी भीती आता व्यक्त केली जात आहे. हा गंभीर प्रकार उघडकीस आल्यानंतर स्थानिक ग्रामस्थ आणि सामाजिक कार्यकर्ते आक्रमक झाले आहेत. ज्या रस्त्यावरून हा ट्रॅक्टर जप्त करण्यात आला आणि ज्या ठिकाणी तो संशयास्पदरीत्या सोडण्यात आला, त्या मार्गावरील सर्व सीसीटीव्ही फुटेज तात्काळ प्रशासनाने ताब्यात घ्यावेत, अशी आग्रही मागणी होत आहे. सीसीटीव्ही फुटेजच्या सखोल तपासणीतून या कथित ६० हजारांच्या देवघेवीचे सत्य समोर येऊ शकते. या संपूर्ण प्रकरणाची वरिष्ठ पातळीवरून निष्पक्ष चौकशी करून दोषी तहसीलदारांवर तात्काळ बडतर्फीची किंवा कडक कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा वेरूळ परिसरातील सजग नागरिकांनी दिला आहे.

# 30 वर्षे न्यायासाठी उंबरठे झिजवून, सोबतीचे दोन भाऊही देवाघरी गेले; जिल्हाधिकारी साहेब शेतकऱ्याची आसवे पुसायला तुमच्याकडे वेळ नाही का?

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** एकीकडे 'शासन आपल्या दारी' अशा मोठ्या घोषणा दिल्या जात असताना, दुसरीकडे मात्र स्वतःच्या हक्काच्या पैशांसाठी एका शेतकऱ्याला तब्बल ३० वर्षे शासकीय कार्यालयाच्या पायऱ्या झिजवाव्या लागत आहेत. त्याहूनही मनाला चटका लावणारी बाब म्हणजे, न्यायाची प्रदीर्घ वाट पाहता पाहता या शेतकऱ्याच्या दोन सख्ख्या भावांचा मृत्यू झाला. पण तरीही छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी च्या संवेदना जाग्या झाल्या नाहीत. न्यायालयाचा स्पष्ट आदेश असतानाही केवळ एक शासकीय लाकडी खुर्ची जप्त होऊ नये म्हणून स्वतःच्या दालनाला कुलूप लावून तीन तास शेतकऱ्याला दारात ताटकळत उभे ठेवण्यात आले. या लाजिरवाण्या आणि असंवेदनशील प्रकारामुळे संपूर्ण जिल्ह्यातून तीव्र संताप व्यक्त होत आहे. न्यायालयाचा वारंवार अवमान होत असल्याचे पाहून संतप्त जिल्हा न्यायालयाने थेट जिल्हाधिकाऱ्यांच्या दालनातील चल मालमत्ता (खुर्ची, टेबल आणि कार्यालयीन साहित्य) जप्त करण्याचे वॉरंट बजावले. गुरुवारी दुपारी न्यायालयाचे बेलिफ, पीडित शेतकरी आणि त्यांचे वकील ॲड. बारहाते हे आदेश घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयात धडकले. आपल्याच कार्यालयात न्यायालयाचे कर्मचारी जप्तीसाठी आलेले पाहताच संपूर्ण प्रशासनात एकच खळबळ उडाली. यावेळी शेतकऱ्याला न्याय देण्याची संवेदनशीलता दाखवण्याऐवजी, "जिल्हाधिकारी जेवणासाठी बाहेर गेले आहेत" असे सांगून त्यांच्या दालनाला बाहेरून कुलूप ठोकण्यात आले. उपजिल्हाधिकारी संगीता राठोड यांनी शेतकऱ्याच्या वकिलांकडे ४ आठवड्यांची मुदत मागितली, मात्र ती देण्यास वकिलांनी नकार दिला. त्यानंतर कडक उन्हात आणि हताश मनस्थितीत न्यायालयाचे कर्मचारी, वृद्ध शेतकरी आणि त्यांचे वकील तब्बल तीन तास त्या कुलूपबंद दालनाबाहेर न्यायाच्या प्रतीक्षेत उभे राहिले. अखेर दालन न उघडल्याने बेलिफने परिस्थितीचा पंचनामा केला. संध्याकाळी सव्वा पाचच्या सुमारास जिल्हाधिकारी विनय गौडा कार्यालयात आले. त्यांनी हा विषय लघु पाटबंधारे विभागाचा असून आपण केवळ शासन प्रतिनिधी म्हणून उत्तर देऊ, अशी कायदेशीर भाषा वापरली. पण विनय गौडा साहेब, कायद्याची पुस्तके आणि सरकारी नियमांच्या पलीकडे जाऊन एक माणूस म्हणून त्या पीडित शेतकऱ्याकडे पाहण्याची तसदी तुम्ही का घेतली नाही? ज्या शेतकऱ्याच्या जमिनीवर प्रकल्प उभे राहिले, ज्याच्या हक्कासाठी त्याचे दोन भाऊ जीव सोडून गेले, त्याला केवळ स्वतःची खुर्ची वाचवण्यासाठी कुलूपबंद दरवाजा दाखवणे कितपत योग्य आहे? जिल्हाधिकाऱ्यांच्या या भूमिकेविरुद्ध आता शेतकरी आणि त्यांच्या वकिलांनी थेट न्यायालयात अवमान याचिका दाखल करण्याची तयारी सुरू केली आहे. पण या संपूर्ण प्रकरणाने छत्रपती संभाजीनगरच्या जिल्हा प्रशासनाचा अत्यंत असंवेदनशील आणि अमानुष चेहरा पुन्हा एकदा समोर आणला आहे.

**काय आहे या शेतकऱ्याची ३० वर्षांची वेदना?**

फुलंब्री तालुक्यातील लिहा येथील शेतकरी बजरंग हरिचंद ताटू यांची सुमारे १६ एकर जमीन १९९६ मध्ये जलसंपदा विभागाने वाकोद प्रकल्पासाठी संपादित केली होती. घरची सुपीक जमीन धरणात गेली, आता हक्काचा मोबदला मिळेल आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह चांगला होईल या अपेक्षेने हे कुटुंब जगत होते. परंतु, प्रशासनाच्या ढिम्म कारभारामुळे त्यांना तब्बल १५ वर्षे मोबदलाच मिळाला नाही.अखेर हताश होऊन ताटू यांनी न्यायालयाचा दरवाजा ठोठावला. ६ ऑगस्ट २०२२ रोजी न्यायालयाने शेतकऱ्याच्या बाजूने ऐतिहासिक निकाल दिला आणि प्रशासनाला तातडीने २ कोटी २२ लाख ६१ हजार १९ रुपयांचा थकीत मोबदला देण्याचे आदेश दिले. मात्र, तरीही जलसंपदा विभाग आणि जिल्हा प्रशासनाने कोर्टाच्या या आदेशाला केराची टोपली दाखवली. सर्वात दुर्दैवी आणि काळजाला चिरून जाणारी गोष्ट म्हणजे, न्यायालयाचा निकाल आल्यानंतरही पैशांची वाट पाहता पाहता बजरंग ताटू यांच्या दोन भावांची प्राणज्योत मालवली.

# जनावरांची निर्दयी वाहतूक : वैजापूर अन् पैठणमध्ये 14 गोवंश सुखरूप तर चार वाहनांसह पावणे दहा लाखांचा मुद्देमाल जप्त

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** जिल्ह्यात गोवंश जनावरांची अवैध आणि अत्यंत अमानुषपणे वाहतूक करणाऱ्या तस्करांविरुद्ध छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलीस दलाने मोठी कारवाई केली आहे. वैजापूर आणि पैठण पोलीस ठाण्याच्या हद्दीत १५ जुलै रोजी पोलिसांनी दोन वेगवेगळ्या ठिकाणी सापळा रचून एकूण १४ गोवंश जनावरांची सुटका केली. या धडक कारवाईत पोलिसांनी वाहतुकीसाठी वापरण्यात येणारी ४ मालवाहू वाहने जप्त केली असून एकूण ९ लाख ८५ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. या प्रकरणी एकूण चार आरोपींविरुद्ध विविध कलमांनुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ग्रामीण पोलिसांनी केलेल्या या संयुक्त कारवाईत एकूण ११ गायी आणि ३ वासरांना सुरक्षितपणे ताब्यात घेऊन त्यांची गोशाळेत रवानगी केली आहे. या धडक मोहिमेमुळे अवैध पशु वाहतूक करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. गोवंश जनावरांची बेकायदेशीर वाहतूक, प्राण्यांवरील क्रूरता आणि कत्तलीसाठी होणारी अवैध ने-आण रोखण्यासाठी छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलिसांच्या वतीने यापुढेही सातत्याने अशा विशेष कारवाया राबविल्या जातील आणि दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा सज्जड इशारा पोलीस प्रशासनाने दिला आहे.



**डायल-११२ च्या माहितीवरून वैजापूर पोलिसांनी उधळला डाव**

वैजापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत १५ जुलै रोजी दुपारी अडीच वाजेच्या सुमारास वैजापूर-शिऊर रोडवरील एम.आय.टी. कॉलेज आणि रोटेगाव रेल्वे पुलाजवळ गोवंश जनावरांची तस्करी होत असल्याची गोपनीय माहिती पोलीस नियंत्रण कक्षाच्या 'डायल-११२' प्रणालीवर प्राप्त झाली. माहिती मिळताच पोलिसांनी क्षणाचाही विलंब न करता रोटेगाव रेल्वे पुलाजवळ नाकाबंदी करून संशयित वाहनांची तपासणी केली. या तपासणीदरम्यान तीन मालवाहू वाहनांमध्ये ७ जनावरे आणि ३ वासरांना अत्यंत दाटीवाटीने, डोकी खाली करून आणि आखूड दोऱ्यांनी बांधून ठेवल्याचे आढळून आले. जनावरांच्या चारा-पाण्याची कोणतीही सोय न करता अत्यंत क्रूरपणे ही वाहतूक केली जात होती. या प्रकरणी पोलिसांनी तात्काळ कारवाई करत सुनील मनोहर मघरे (रा. टाकळी, ता. सिल्लोड), जुबेर फरीद कुरेशी आणि आसिफ भिकन शहा (दोघे रा. पिशोर, ता. कन्नड) या तीन आरोपींना अटक केली. त्यांच्या ताब्यातून दोन बोलेरो पिकअप आणि एक अशोक लेलँड टेम्पो अशी तीन वाहने आणि जनावरांसह ६ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींविरुद्ध वैजापूर पोलीस ठाण्यात प्राणी क्रूरता प्रतिबंधक अधिनियमांतर्गत गुन्हा नोंदवला आहे.

**पैठणच्या जायकवाडी फाट्यावर टाटा छोटा हत्ती जप्त**

दुसरी कारवाई पैठण पोलीस ठाण्याच्या पथकाने १५ जुलै रोजीच सायंकाळी पावणे आठ वाजेच्या सुमारास जायकवाडी फाट्यावर केली. संशयास्पद वाटणाऱ्या एका टाटा छोटा हत्ती वाहनाला अडवून तपासणी केली असता, त्यात दोन गोवंश जनावरे कत्तलीच्या उद्देशाने अमानुषपणे डांबून ठेवल्याचे उघडकीस आले. या प्रकरणी पोलिसांनी तात्काळ कारवाई करत शफीक रफीक शेख (वय ३६ वर्षे, रा. रांजणगाव दांडगा, ता. पैठण) याला ताब्यात घेतले. पोलिसांनी ३ लाख ४५ हजार रुपयांच्या मुद्देमालासह वाहन आणि जनावरे जप्त करून आरोपीविरुद्ध प्राणी संरक्षण कायदा आणि प्राणी क्रूरता प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे.

## कै. धर्मवीर सावे स्मृतिदिनी विद्यार्थ्यांना मोफत स्कूल बॅगचे वाटप



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** कै. खासदार धर्मवीर मोरेश्वरजी सावे यांच्या स्मृतिदिनानिमित्त गुरुवारी बजरंग चौक, पुंडलिकनगर व कैलासनगर संपर्क कार्यालयांमध्ये अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी राज्याचे कॅबिनेट मंत्री अतुल सावे यांच्या प्रमुख उपस्थितीत कै. सावे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या सामाजिक व लोकहिताच्या कार्याला अभिवादन करण्यात आले. स्मृतिदिनानिमित्त सामाजिक उपक्रम म्हणून शालेय विद्यार्थ्यांना मोफत स्कूल बॅगचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना कॅबिनेट मंत्री अतुल सावे यांनी शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करत जिद्द, शिस्त आणि परिश्रमाच्या बळावर उज्वल भविष्य घडविण्याचे आवाहन केले. तसेच शासनाच्या विविध शैक्षणिक योजनांची माहिती देत शिक्षणात सातत्य राखण्याचे आवाहन केले.

कैलासनगर, राजाबाजार येथे अजिंक्य सावे यांच्या हस्तेही विद्यार्थ्यांना स्कूल बॅगचे वितरण करण्यात आले. यावेळी स्थायी समितीचे सभापती अनिल मकरीये, महानगरपालिका गटनेते गोविंद केंद्रे, नगरसेवक-नगरसेविका, भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमाचे आयोजन अशोक गोरे यांनी केले.

## शिवसेनेतर्फे श्री जगन्नाथ रथयात्रेचे स्वागत



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** आंतरराष्ट्रीय कृष्ण भावनामृत संघ (इस्कॉन) यांच्या वतीने भगवान श्री जगन्नाथ, बलभद्र आणि देवी सुभद्रा यांच्या भव्य श्री जगन्नाथ रथयात्रेला गुरुवारी (दि. १६) शहरात भक्तिमय वातावरणात प्रारंभ झाला. या रथयात्रेचे शिवसेना छत्रपती संभाजीनगर शाखेच्या वतीने उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले.

यावेळी शिवसेना नेते तथा माजी खासदार चंद्रकांत खैरे यांनी रथयात्रेचे दर्शन घेत भगवान श्री जगन्नाथांचे पूजन करून आरती केली. तसेच रथयात्रेत सहभागी झालेल्या भाविकांचे स्वागत करत सर्वांच्या कल्याणासाठी प्रार्थना करण्यात आली. या प्रसंगी शिवसेना महिला आघाडीच्या मीरा देशपांडे, नलिनी बाहेती यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. भक्तिमय वातावरण, हरिनामाचा गजर आणि जयघोषात रथयात्रेचे शहरातून उत्साहपूर्ण स्वागत करण्यात आले.

## मधमाशी पालनासाठी प्रशिक्षण व 50 टक्के अनुदान; पात्र व्यक्ती व संस्थांकडून अर्ज मागविले

हिंदु प्रकाश वार्ता / प्रतिनिधी

**परभणी, :** महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या शासन निर्णयानुसार महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत राज्यभर मध केंद्र योजना राबविण्यात येत असून, पात्र व्यक्ती व संस्थांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

या योजनेअंतर्गत मधमाशी पालन व्यवसायासाठी आवश्यक प्रशिक्षण, साहित्य स्वरूपात ५० टक्के अनुदान, उर्वरित ५० टक्के स्वगुंतवणूक, शासनाच्या हमीभावाने मध खरेदी, विशेष प्रशिक्षण सुविधा तसेच मधमाशांचे संरक्षण व संवर्धनाबाबत जनजागृती करण्यात येणार आहे. योजनेसाठी वैयक्तिक मधपाल, प्रगतिशील मधपाल केंद्रचालक तसेच नोंदणीकृत संस्था पात्र आहेत. वैयक्तिक मधपालासाठी अर्जदार साक्षर असणे, वय १८ वर्षांपेक्षा जास्त असणे आणि १० दिवसांचे प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे. केंद्रचालकासाठी किमान १० वी उत्तीर्ण, वय २१ वर्षांपेक्षा जास्त, किमान १ एकर शेती तसेच मधमाशी पालन व प्रशिक्षण देण्याची क्षमता आवश्यक आहे. संस्थांसाठी नोंदणीकृत संस्था, किमान १,००० चौ. फूट इमारत, १ एकर शेती आणि आवश्यक प्रशिक्षण सुविधा असणे आवश्यक आहे. लाभार्थी निवडीनंतर प्रशिक्षणापूर्वी मधमाशी पालन व्यवसाय सुरू करण्याबाबत मंडळास बंधपत्र देणे तसेच मंडळाने निश्चित केलेल्या ठिकाणी प्रशिक्षण घेणे बंधनकारक राहील. अधिक माहितीसाठी महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, एम. एन. खान असोसिएट, एस.बी.आय. कार्यालयामागे, स्टेडियम रोड, परभणी येथे दूरध्वनी क्रमांक ०२४५२-२२०४९० वर संपर्क साधावा.

## सोयगाव बस आगारात 78 व्या वर्धापन दिनानिमित्त वृक्षरोपण संपन्न



हिंदू प्रकाशवार्ता/ प्रतिनिधी

**सोयगाव,दि.१६ जुलै :** राज्य परिवहन महामंडळाच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त परिवहन मंत्री प्रतापजी सरनाईक यांच्या संकल्पनेतून आगारात दि.१४ मंगळवार रोजी माजी सरपंच नंदाताई आगे आमखेडा यांच्या हस्ते बस आगारात वृक्षरोपण करण्यात आले. यावेळी आगार प्रमुख मनिष जवळेकर,सहाय्यक वाहतूक निरीक्षक कैलास बागुल,लिपिक सतीश पाटील,विनोद जाधव,वर्जन जाधव, अशोक तायडे,संतोष पाखरे,मधुकर आमटे सह चालक,वाहक, व यांत्रिक कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीदिनी आरक्षण उपवर्गीकरण जाहीर करा : सचिन साठे

हिंदू प्रकाशवार्ता । प्रतिनिधी



**अजिंठा प्रतिनिधी :** मा सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार राज्य सरकार घेत असलेल्या अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण अ ब क ड निर्णयाच्या समर्थनार्थ सकल मातंग समाज तसेच अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण समर्थन कृती समिती सिल्लोड तालुका यांच्या वतीने संविधानीक न्याय हक्क महामोर्चा चे आयोजन करण्यात आले होते.

एक ऑगस्ट २०२४ रोजी मा सर्वोच्च न्यायालयाने आरक्षण उपवर्गीकरण करण्यासंदर्भात राज्य सरकारला निर्देश दिलेले आहेत तसेच राज्य सरकारने मा. न्यायमुर्ती अनंत बदर यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या बदर समितीने सुद्धा त्यांचा अहवाल राज्य सरकारला सादर केलेला आहे त्यामुळे कुठल्याही दबावाला बळी न पडता मा सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार राज्य सरकारने एक ऑगस्ट रोजी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीदिनी अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरणाचा निर्णय जाहीर करावा व त्याची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी अशी मागणी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे नातु तथा ए बी एस क्रांती सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष सचिन साठे यांनी मोर्चाला संबोधित करताना महाराष्ट्र सरकाला केली आहे.

यावेळी सकल मातंग समाज तसेच आरक्षण उपवर्गीकरण समर्थन कृती समिती सिल्लोड तालुका यांच्या वतीने परिविक्षाधिन उपजिल्हाधिकारी तथा सिल्लोड तहसिलच्या तहसिलदार अंकीता ताकभाते यांच्या मार्फत महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यांना निवेदन दिले.

यावेळी लहुजी क्रांती सेनेचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अशोकराव कांबळे, प्रदेश उपाध्यक्ष सखाराम आहीरे, भारतीय दलीत संसदेचे अध्यक्ष अंबादास सगट, लहुजी क्रांती सेनेचे प्रदेश सचिव कैलास पाजगे, अण्णाभाऊ साठे फाउंडेशनचे अध्यक्ष राजु भालेराव, लहुजी क्रांती सेनेचे मराठवाडा अध्यक्ष नानासाहेब गायकवाड यांनी मोर्चाला संबोधित केले.

सदरील मोर्चाचे सुत्रसंचलन फकीरचंद तांबे यांनी केले तर आभार विजय खाजेकर यांनी मानले.

यावेळी कमलताई घाडगे, सुवर्णाताई साबळे,सामाजिक कार्यकर्ते साहेबराव सोनवणे,विष्णू सोनवणे,नामदेव खेत्रे,सोमिनाथ भालेराव,सुधाकर कासारे, विनायक वाघुले,संजय कांबळे,सागर खेत्रे, संजय आहीरे,कैलास खरात, समाधान गायकवाड,अशोक शिंदे,बाबुराव आहीरे,संजय मोरे, समाधान लोखंडे,फकिरचंद तांबे,साहेबराव आहीरे, साहेबराव दनके,रतन अंभोरे, सुखदेव कांबळे,शिवराम कांबळे, सर्जेराव शेजुळ,राजेंद्र गोफणे,किसन सौदागर, रविंद्र महाले, दुर्गादास जाधव, सखाराम भिसे,कचरु उन्होने ,महेंद्र आहीरे, विष्णु सौदागर, ज्ञानेश्वर नाडे,समाधान कांबळे,भगवान सोनवणे,सुनिल आहीरे,विशाल आहीरे ,बाजीराव कांबळे,विठ्ठल कांबळे,आकाश आहीरे, कैलास मोरे,विष्णु साळवे,अमोल खेत्रे,किशोर भिसे,दिपक कांबळे, विलास घोरपडे, दत्तु आहीरे, संदीप चंदनशिवे, कैलास भाले,मच्छींद्र बहीलम, दिपक लोखंडे,रवि दनके, सतिश शेलार,नितीन दनके, गजानन कांबळे, विठ्ठल खोतकर, रमेश आहीरे,आनंदा खेत्रे, नितीन सौदागर,प्रदीप साठे,सोमिनाथ कांबळे,संजय पारधे, पुंजाराम कांबळे,आकाश गायकवाड, जनार्दन दनके, कृष्णा सोनवणे,अमोल काकफळे, गजानन चंदनशिव, सुभाष कांबळे, कपिल शेजुळ,आनंद गायकवाड,आदी समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ग्रामीण भागातील सर्व जिल्हा परिषद शाळांत नशामुक्ती व बालविवाह प्रतिबंध जनजागृती अभियान उत्साहात

### विद्यार्थी, शिक्षक व ग्रामस्थांनी घेतली नशामुक्ती आणि बालविवाह प्रतिबंधाची सामूहिक शपथ

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** जिल्ह्यात १३ ते ३१ जुलैदरम्यान राबविण्यात येत असलेल्या नशामुक्ती अभियान व बालविवाह प्रतिबंध अभियानाला ग्रामीण भागात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांच्या सूचनेनुसार गुरुवारी जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषद शाळांमध्ये आरोग्य विभागाच्या वतीने व्यापक जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

या अभियानांतर्गत आरोग्य विभागाचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शाळांना भेट देऊन विद्यार्थी, शिक्षक आणि ग्रामस्थांशी संवाद साधला. तंबाखू, गुटखा, पानमसाला, सिगारेट, बीडी व मद्य यांसारख्या व्यसनांचे शरीर आणि मनावर होणारे दुष्परिणाम तसेच शिक्षण, आरोग्य आणि भविष्यातील प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

विद्यार्थ्यांना व्यसनामुळे शारीरिक आरोग्य बिघडणे, मानसिक तणाव व नैराश्य वाढणे, वाईट संगती लागणे, आत्मविश्वास कमी होणे आणि स्मरणशक्तीवर परिणाम होणे याबाबत जागरूक करण्यात आले. तसेच शैक्षणिक संस्थांच्या १०० मीटर परिसरात तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रीस बंदी असल्याची माहिती देण्यात आली. व्यसनाची सुरुवात झाल्याचे आढळल्यास जवळच्या आरोग्य संस्थेत संपर्क साधून शासनमान्य व्यसनमुक्ती केंद्रात उपचार व समुपदेशन घेण्याचे आवाहनही करण्यात आले. नियमित आरोग्य तपासणी, योग, ध्यान आणि आरोग्यदायी जीवनशैलीचा अवलंब करण्याचा संदेश देण्यात आला. यानंतर सर्व विद्यार्थी, शिक्षक, ग्रामस्थ आणि आरोग्य विभागाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी नशामुक्तीची सामूहिक शपथ घेतली.

याच कार्यक्रमात बालविवाह प्रतिबंध विषयावरही मार्गदर्शन करण्यात आले. मुलीचे वय १८ वर्षांपेक्षा कमी आणि मुलाचे वय २१ वर्षांपेक्षा कमी असताना होणारा विवाह हा बालविवाह प्रतिबंध अधिनियम, २००६ अंतर्गत कायद्याने गुन्हा असल्याची माहिती देण्यात आली. बालविवाहामुळे मुलींचे शिक्षण खंडित होणे, अल्पवयीन गर्भधारणेमुळे माता व बालकाच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होणे, माता व बालमृत्यूचा धोका वाढणे, कुपोषण, मानसिक तणाव, आर्थिक स्वावलंबनात अडथळे आणि विविध सामाजिक समस्या निर्माण होण्याची शक्यता याबाबत उपस्थितांना सविस्तर माहिती देण्यात आली. कार्यक्रमाच्या शेवटी मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, ग्रामस्थ तसेच आरोग्य विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी बालविवाह प्रतिबंधाची सामूहिक शपथ घेतली. प्रत्येक मुलगा-मुलीचे शिक्षण पूर्ण होण्यासाठी प्रोत्साहन देणे, विवाहपूर्वी वयाची खात्री करणे, संशयास्पद बालविवाहाची माहिती तात्काळ प्रशासनाला देणे तसेच ग्रामपंचायत, शाळा, महिला व बालविकास विभाग, पोलीस आणि आरोग्य विभाग यांनी समन्वयाने कार्य करून नशामुक्त व बालविवाहमुक्त छत्रपती संभाजीनगर घडविण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

## मतदार यादी ही लोकशाहीचा पाया; घरपोच पडताळणीला सहकार्य करा : संजयसिंह चव्हाण

हिंदु प्रकाश वार्ता / प्रतिनिधी

**परभणी, :-** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार परभणी जिल्ह्यात विशेष सखोल पुनरिक्षण (Special Intensive Revision – SIR) कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत असून, जिल्ह्यातील चारही विधानसभा मतदारसंघांमध्ये कामाला वेग आला आहे.

दिनांक 16 जुलै 2026 रोजी सकाळी 10.00 वाजेपर्यंतच्या अहवालानुसार, जिल्ह्यातील 1,541 बूथ लेव्हल अधिकारी (BLO) यांच्यामार्फत सर्व 1,623 मतदान केंद्रांवर काम सुरू असून, 100 टक्के BLO ना प्रशिक्षण देण्यात आले आहे. तसेच सर्व मतदान केंद्रांचे भाग (EF Parts) डाउनलोड व मुद्रित करण्यात आले आहेत.

जिल्ह्यातील एकूण 15,41,007 मतदारांपैकी 14,72,193 (95.53%) मतदारांपर्यंत बूथ लेव्हल अधिकारी पोहोचले असून, आतापर्यंत 7,66,175 (49.72%) मतदारांचे फॉर्म डिजिटायझेशन पूर्ण झाले आहे. उर्वरित मतदारांचे अर्ज स्वीकारणे व डिजिटायझेशनचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.

चारही विधानसभा मतदारसंघांमध्ये बूथ लेव्हल अधिकारी नागरिकांच्या घरी भेट देऊन आवश्यक माहिती व कागदपत्रांची पडताळणी करीत आहेत. नागरिकांनी बूथ लेव्हल अधिकारी यांना आवश्यक सहकार्य करून निर्धारित नमुन्यातील अर्ज वेळेत भरून द्यावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

"मतदार यादी ही लोकशाहीचा पाया आहे. प्रत्येक पात्र मतदाराची माहिती अचूक व अद्ययावत राहणे अत्यंत आवश्यक आहे. विशेष सखोल पुनरिक्षण (SIR) प्रक्रियेदरम्यान बूथ लेव्हल अधिकारी आपल्या घरी भेट देतील. त्यांना आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून द्या, अर्ज वेळेत भरून द्या आणि या महत्त्वपूर्ण प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवा. कोणताही पात्र मतदार वंचित राहू नये, यासाठी प्रत्येक नागरिकाने सहकार्य करावे. परभणी जिल्हा प्रशासन आपल्या सेवेस सदैव तत्पर आहे."

नागरिकांसाठी सूचना

बूथ लेव्हल अधिकारी घरी आल्यास त्यांची ओळख पटवून सहकार्य करावे. आवश्यक कागदपत्रे तत्काळ उपलब्ध करून द्यावीत. अर्ज अचूक व पूर्ण भरावा. कोणतीही शंका असल्यास संबंधित मतदान केंद्र स्तर अधिकारी किंवा निवडणूक कार्यालयाशी संपर्क साधावा.

## एसआयआर प्रशिक्षणाला महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी,:** भारत निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण (SIR) कार्यक्रमांतर्गत कै. कमलताई जामकर महिला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनांच्या (NSS) विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत एसआयआर मोहिमेत बीएपलओंना सहकार्य करण्याचा संकल्प केला. हा प्रशिक्षण कार्यक्रम उपजिल्हाधिकारी (निवडणूक) अरुणा संगेवार व उपविभागीय अधिकारी उदयसिंह भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली, नोडल अधिकारी प्रा. गणेश शिंदे यांच्या नियोजनातून आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. रामचंद्र भिसे होते. यावेळी एसआयआर पथकातील अरविंद शहाणे, मोहन आल्हाट, प्रफुल्ल शहाणे, त्र्यंबक वडसकर, रामप्रसाद अवचार आदी उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. भिसे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, देशसेवा करण्यासाठी मोठ्या संधींचीच गरज नसते. छोट्या-छोट्या कृतींमधूनही राष्ट्रीय कार्यात मोलाचे योगदान देता येते. मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेत सहभागी होऊन विद्यार्थ्यांनी लोकशाही अधिक सक्षम करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे त्यांनी आवाहन केले.

## जालना–नांदेड द्रुतगती महामार्गासाठी सक्तीच्या भूसंपादन प्रक्रियेदरम्यान सेलू तालुक्यात प्रतिबंधात्मक आदेश लागू

हिंदु प्रकाश वार्ता / प्रतिनिधी

**परभणी :** हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गास जोडणाऱ्या जालना–नांदेड द्रुतगती महामार्गासाठी सक्तीच्या भूसंपादनाची प्रक्रिया सुरळीत व शांततेत पार पाडण्यासाठी सेलू उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम १६३ अन्वये दि. १७ व १८ जुलै रोजी प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.

जालना–नांदेड द्रुतगती महामार्गासाठी भूसंपादनाबाबत संबंधित खातेदारांना यापूर्वी नोटिसा देऊन तसेच विविध पद्धतीने आवाहन करूनही काही ठिकाणी जमिनींचा ताबा मिळालेला नसल्याने सक्तीच्या भूसंपादनाची कार्यवाही करण्यात येणार आहे. या प्रक्रियेदरम्यान संबंधित गटधारकांव्यतिरिक्त इतर व्यक्ती एकत्र येऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करण्याची किंवा कामकाजात अडथळा आणण्याची शक्यता लक्षात घेऊन हे आदेश लागू करण्यात आले आहेत. या आदेशानुसार सेलू तालुक्यात दि. १७ आणि १८ जुलै २०२६ रोजी जवळा जिवाजी, चिकलठाणा (बु.), चिकलठाणा (खु.), रायपूर आणि वालूर या गावांमध्ये सक्तीच्या भूसंपादनाच्या दिवशी संबंधित खातेदारांव्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीस प्रवेश करण्यास मनाई करण्यात आली आहे. तसेच संबंधित गावातील नागरिकांव्यतिरिक्त इतर गावांतील नागरिकांनाही त्या दिवशी संबंधित गावांच्या हद्दीत प्रवेश करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. अपरिहार्य कारणास्तव संबंधित गावात प्रवेश करावयाचा असल्यास संबंधित नागरिकांनी पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन सेलू अथवा पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन बोरी (ता. जिंतूर) यांची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहील. हे आदेश दि. १५ जुलै २०२६ रोजी रात्री १२ वाजल्यापासून ते दि. १८ जुलै २०२६ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत लागू राहतील, असे निर्देशही उपविभागीय दंडाधिकारी शैलेश लाहोटी यांनी दिले आहेत.

## सावळदबारा सर्कलमधील गावांना भाजपचे तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यांच्या भेटी; नागरिकांनी एसआयआर नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी



**सावळदबारा प्रतिनिधी :** बीएलओ घरोघरी जाऊन तसेच बूथवर थांबून मतदारांच्या माहितीची पडताळणी करत आहेत. दि. १६ जुलै रोजी भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यांनी सावळदबारा सर्कलमधील विविध गावांना भेट देऊन नागरिकांशी संवाद साधत एसआयआर नोंदणी प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्याचे आवाहन केले.

यावेळी त्यांनी सावळदबारा परिसरातील तसेच सावळदबारा गावातील सर्व नागरिकांनी बीएलओंना आवश्यक सहकार्य करून एसआयआरचा अर्ज भरून द्यावा, असे सांगितले. बीएलओ आपल्या प्रभागात दररोज भेट देत असून नागरिकांनी त्यांना योग्य माहिती व आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून द्यावीत,

एसआयआरचा फॉर्म वेळेत भरून दिल्यास मतदार यादीतील नाव कायम राहण्यास मदत होईल. मतदार यादीतील नाव कायम राहणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असून, बीएलओ आपल्या घरी आल्यानंतर त्यांना आवश्यक माहिती देऊन एसआयआर प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन गुलाबराव पाटील कोलते यांनी केले. सावळदबारा, डाभा, घाणेगाव, मोलखेडा, पिपळवाडी, महालब्धा, नादाताडा,हिवरी, आदी गावांना भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यांच्या भेटी; नागरिकांनी एसआयआर नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी

## महिला शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शन शिबिर व एफपीओ स्थापनेबाबत 22 जुलै रोजी विशेष कार्यक्रम

हिंदू प्रकाशवार्ता/ गोपाल सातपुते



**वाशिम |** महिला किसान सक्षमीकरण योजनेअंतर्गत वाशिम जिल्ह्यातील कोंडाळा झामरे (ता. वाशिम) येथे महिला शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शन शिबिर तसेच महिला फार्मर प्रोड्युसर कंपनी (FPO) स्थापनेबाबत विशेष बैठकीचे आयोजन २२ जुलै २०२६ रोजी करण्यात आले आहे.

या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून आत्मा (ATMA) प्रकल्प संचालक अनिल महाकळे यांना उपस्थित राहून महिला शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्याची विनंती भाजप महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष सौ. कविता परमेश्वर खरात यांनी केली आहे.

या मार्गदर्शन शिबिरामध्ये महिला शेतकऱ्यांना शासनाच्या विविध कृषी योजनांची माहिती, आधुनिक शेती तंत्रज्ञान, सामूहिक शेती, मूल्यवर्धन, बाजारपेठ उपलब्धता, आर्थिक सक्षमीकरण तसेच फार्मर प्रोड्युसर कंपनी (FPO) स्थापनेची प्रक्रिया, त्याचे फायदे आणि शासनाकडून मिळणाऱ्या विविध सहाय्य योजनांची सविस्तर माहिती दिली जाणार आहे.

महिला शेतकऱ्यांनी संघटित होऊन आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे, आधुनिक शेती पद्धतींचा अवलंब करावा आणि एफपीओच्या माध्यमातून शेती उत्पादनाला योग्य बाजारपेठ मिळावी, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश असल्याचे सौ. कविता खरात यांनी नमूद केले आहे.

या कार्यक्रमास परिसरातील महिला शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## लाभार्थ्यांना दर्जेदार धान्य देण्यास प्रशासन कटिबद्ध; धान्य वितरणातील त्रुटींवर तातडीची दुरुस्ती

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी,:** सार्वजनिक वितरण प्रणालीअंतर्गत लाभार्थ्यांना वितरित करण्यात येणारे धान्य भारतीय अन्न महामंडळ (FCI) व शासनाने निश्चित केलेल्या कार्यपद्धतीनुसार प्राप्त होऊन संबंधित गोदामांमार्फत रास्तभाव दुकानदारांना उपलब्ध करून दिले जाते.

लाभार्थ्यांना कोणत्याही प्रकारचा निकृष्ट दर्जाचा अथवा खाण्यायोग्य नसलेला धान्यसाठा वितरित होऊ नये, याबाबत पुरवठा विभाग कटिबद्ध असून धान्य वितरण प्रक्रियेवर सातत्याने देखरेख ठेवली जात आहे. हवामानातील बदलामुळे क्वचित प्रसंगी कुठे धान्य खराब झाले असल्यास ते धान्य त्वरीत बदलून देण्याबाबत संबंधितांना सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच शासनाच्या निर्देशानुसार एप्रिल ते जून 2026 या महिन्याचे धान्य एकत्रित वाटण्यात येणार होते, मात्र परभणी जिल्ह्याकरिता नियुक्त तत्कालीन वाहतूक कंत्राटदाराकडून एप्रिल महिन्याचे वेळेत धान्य उचल करून पोहचवण्यात आले नाही.

# उलवे नोड मधिल सेक्टर 24, 25, 25 अ मधिल रस्त्यावंर पडलेल्या खड्ड्यांच्या विरोधात मनसे आक्रमक

## खड्डे त्वरित न बुजविल्यास आंदोलनाचा इशारा







हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण / रायगड** : दिनांक १६ / ०७ /२०२६ रोजी उलवे नोड मधिल महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पदाधिकारी व स्थानिक महिलांनी सिडको अधिकारी गोसावी यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले .निवेदन द्वारे रस्ता दुरुस्तीची मागणी करण्यात आली.सेक्टर २४ ,२५ ,२५ अ मध्ये रस्त्यांची अवस्था फार खराब झालेली आहे. रस्त्यात खड्डे आहेत की खड्ड्यात रस्ते आहेत हेच समजत



नाही .मनसेच्या पदाधिकारी व स्थानिक महिला वर्गांनी सिडको अधिकारी यांच्याशी सविस्तर चर्चा केली.या प्रसंगी महत्वाची समस्या लक्षात घेता सिडको अधिकारी गोसावी यांनी सांगितले की लवकरात लवकर सर्व खड्डे भरण्यात येतील असे आश्वासन दिले परंतु खड्डे न भरल्यास रस्त्यांवर पडलेल्या खड्ड्यात वृक्षारोपण करण्यात येईल असे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतिने लेखी पत्र देण्यात आले.यावेळी उलव्याचे माजी शहर अध्यक्ष राहुल बाबुराव पाटील, मनिषा राहुल पाटील ,तसेच सुनिता नामदेव पाटील, रेश्मा संदेश म्हात्रे, गव्हाण विभाग उपाध्यक्ष बबलु पाटील, पनवेल तालुका सचिव निर्दोष केशव गोंधळी ,उलवे शहर अध्यक्ष आकाश देशमुख आदि पदाधिकारी व महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते.रस्त्यात असलेल्या खड्ड्यामुळे अनेक लहान मोठे अपघात झाले असून या खड्ड्यामुळे नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण झाले. एखादा अपघात होऊन एखाद्याचा मृत्यू सुद्धा होण्याची शक्यता नाकारता येत नाही.त्यामुळे रस्ते सुरक्षेला व नागरिकांच्या आरोग्य व जीवनाला सर्वोच्च प्राधान्य देत मनसेने निवेदन देत त्वरित रस्ते, खड्डे दुरुस्तीची मागणी केली आहे.

# देवाभाऊ कृतज्ञता सेवा सप्ताहात जगन्नाथ रथयात्रेत भाविकांना महाप्रसाद वाटप

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रमांना प्रारंभ

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त १६ ते २२ जुलै या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या 'देवाभाऊ कृतज्ञता सेवा सप्ताह' अंतर्गत गुरुवारी भगवान श्री जगन्नाथ रथयात्रेत सहभागी झालेल्या हजारो भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. स्थायी समितीचे सभापती अनिल मकरिये यांच्या पुढाकाराने हा उपक्रम राबविण्यात आला.



आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघ (इस्कॉन) यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य भगवान श्री जगन्नाथ रथयात्रेत शहरातील विविध भागांतील भाविकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. यावेळी सेवा सप्ताहाच्या निमित्ताने भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. तसेच रथयात्रेच्या माध्यमातून स्वच्छता, सेवा आणि सामाजिक बांधिलकीचा संदेशही देण्यात आला.

भगवान श्री जगन्नाथांची रथयात्रा गांधी चौक, सराफा बाजार रोड, मच्छली खडक, गुलमंडी, संभाजीपेठ, नागेश्वरवाडी, निराला बाजार, समर्थ नगर आणि भाग्यनगर या प्रमुख मार्गांवरून भक्तिमय वातावरणात मार्गक्रमण करत इस्कॉन मधुवन येथे पोहोचली. मार्गावर विविध ठिकाणी नागरिकांनी रथयात्रेचे स्वागत करून भगवान श्री जगन्नाथांचे दर्शन घेतले. इस्कॉन मधुवन येथे महाआरतीनंतर रथयात्रेची भक्तिभावाने सांगता झाली.

आयोजकांच्या माहितीनुसार, 'देवाभाऊ कृतज्ञता सेवा सप्ताह' अंतर्गत आगामी दिवसांत शहरात विविध सामाजिक, धार्मिक आणि जनकल्याणकारी उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# घाटीत आज रक्तदान शिबीर; रासेयोच्या स्वयंसेवकांचा सहभाग

**छत्रपती संभाजीनगर** : शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) येथे शुक्रवार (दि. १७) रोजी सकाळी १०.३० ते दुपारी २.३० या वेळेत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी संलग्न शहरातील ३५ महाविद्यालयांतील राष्ट्रीय सेवा योजना (रासेयो) स्वयंसेवक सहभागी होणार आहेत. प्रत्येक रासेयो युनिटमधून किमान दहा स्वयंसेवकांनी रक्तदानासाठी उपस्थित राहावे, असे आवाहन रासेयो संचालक डॉ. सोमीनाथ खाडे यांनी केले आहे. घाटी रुग्णालयात मराठवाड्यासह राज्यातील विविध जिल्ह्यांतून मोठ्या संख्येने रुग्ण उपचारासाठी येतात. दररोज अनेक रुग्णांना तसेच थॅलेसेमिया ग्रस्त बालकांना रक्ताची गरज भासत असल्याने रक्तसाठा वाढविण्यासाठी हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. रक्तदानाच्या या सामाजिक उपक्रमात युवकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन रक्तदानाचा संदेश समाजात पोहोचवावा, असे आवाहन घाटी प्रशासनाने केले आहे.

# छत्रपती संभाजी राजे साखर कारखान्यात मिल रोलरचे पूजन; 2026-27 गळीत हंगामाच्या पूर्वतयारीला वेग

## उपाध्यक्ष दामोधर हरिभाऊजी नवपुते यांच्या हस्ते विधिवत पूजन; अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : छत्रपती संभाजी राजे साखर कारखान्यात २०२६-२७ च्या ऊस गळीत हंगामाच्या पूर्वतयारीतील महत्त्वाचा टप्पा असलेल्या मिल रोलरचे विधिवत पूजन गुरुवार, दि. १६ जुलै रोजी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. कारखान्याचे उपाध्यक्ष मा. श्री. दामोधर हरिभाऊजी नवपुते यांच्या हस्ते पूजन करण्यात आले.

यावेळी कारखान्याचे जनरल मॅनेजर श्री. डिगंबर बडदे, चीफ इंजिनिअर राजेंद्र भागवत, चीफ



केमिस्ट मुरलीधर केदारे, मुख्य लेखापाल शिवाजीराव टकले, आसवनी प्रकल्प व्यवस्थापक सितारामजी खरात, शेतकी अधिकारी नानासाहेब कुटे, वसुली अधिकारी बाळासाहेब बागडे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी व कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यंदाचा ऊस गळीत हंगाम यशस्वी, सुरळीत आणि विक्रमी करण्याच्या दृष्टीने कारखान्यातील यंत्रसामग्रीची देखभाल, दुरुस्ती व तांत्रिक तयारी अंतिम टप्प्यात असून मिल रोलर पूजनाने गळीत हंगामाच्या तयारीला औपचारिक सुरुवात झाल्याचे यावेळी सांगण्यात आले.

कारखाना प्रशासनाने सर्व विभागांनी समन्वयाने काम करून शेतकऱ्यांचा ऊस वेळेत गाळपासाठी स्वीकारण्याचे नियोजन केले असून, आगामी गळीत हंगाम अधिक कार्यक्षम आणि यशस्वी करण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात येत असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

# खरीप 2026 साठी क्रिस्टल क्रॉप प्रोटेक्शनच्या सहा अत्याधुनिक कृषी नवकल्पना

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**मुंबई** : खरीप हंगामातील बदलते हवामान, कीड-रोगांचा वाढता प्रादुर्भाव आणि उत्पादनवाढीची गरज लक्षात घेऊन क्रिस्टल क्रॉप प्रोटेक्शन लिमिटेडने खरीप २०२६ साठी सहा अत्याधुनिक कृषी उत्पादने सादर केली आहेत. सोयाबीन, मका, भात आणि कापूस या प्रमुख पिकांसाठी विकसित करण्यात आलेली ही उत्पादने शेतकऱ्यांचे उत्पादन, गुणवत्ता आणि नफा वाढविण्यास मदत करतील, असा कंपनीचा दावा आहे.

सोयाबीनसाठी पेटंट तंत्रज्ञानावर आधारित 'सामोरियन' आणि मक्यासाठी 'टाकुरो' ही तणनाशके सादर करण्यात आली असून ती गवत व रुंद पानांच्या तणांवर प्रभावी नियंत्रण ठेवतात. भात पिकासाठी 'झेबेरिया' आणि 'मॅक्सेंट्रा' ही बुरशीनाशके विकसित करण्यात आली असून ती बुरशीजन्य व जिवाणूजन्य रोगांवर नियंत्रण ठेवून पिकाची गुणवत्ता सुधारतात. कापसासाठी स्मार्ट ट्रिपल ॲक्शन तंत्रज्ञानावर आधारित 'वाल्टुवा' हे कीटकनाशक रसशोषक किडींवर प्रभावी संरक्षण देते. तसेच GreenAg तंत्रज्ञानावर आधारित 'KGR-T' हे सेंद्रिय पोषण उत्पादन फुले, फळधारणा आणि पिकाची वाढ सुधारण्यास उपयुक्त ठरणार आहे.

# शेतकरी कर्जमुक्तीच्या निर्णयाबद्दल भाजपा किसान मोर्चाच्या वतीने मुख्यमंत्र्यांचा मुंबईत जाहीर सत्कार

**जिंतूर, प्रतिनिधी** : राज्य शासनाने राबविलेल्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' अंतर्गत शेतकऱ्यांना दिलासा देणारा ऐतिहासिक निर्णय घेतल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे भाजपा किसान मोर्चा, महाराष्ट्र प्रदेश तसेच राज्यभरातील शेतकरी बांधवांच्या वतीने जाहीर सत्कार करण्यात आला. हा सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात आणि मोठ्या उपस्थितीत पार पडला.

यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. शेतकरी हिताला प्राधान्य देत राज्य सरकारने कर्जमुक्तीचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतल्याबद्दल उपस्थित मान्यवरांनी मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन



केले. या निर्णयामुळे राज्यातील लाखो शेतकरी कुटुंबांना आर्थिक दिलासा मिळणार असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

या कार्यक्रमास भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, आदिवासी विकास मंत्री अशोक उईके, खासदार अनिल बोंडे, भाजपा प्रदेश सरचिटणीस संजय कुटे, भाजपा महाराष्ट्र प्रदेश महिला मोर्चाच्या अध्यक्षा चित्रा वाघ यांच्यासह अनेक आमदार, भाजपा किसान मोर्चाचे राज्य, जिल्हा, तालुका व शहर पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच राज्याच्या विविध भागांतून आलेले शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सत्कार सोहळ्यात उपस्थितांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाने शेतकरी कल्याणासाठी घेतलेल्या विविध निर्णयांचे स्वागत करत, भविष्यातही शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशाच लोकाभिमुख योजना राबविण्याची अपेक्षा व्यक्त केली.

# अयोध्येतील देणगी अपहार प्रकरणाच्या चौकशीच्या मागणीसाठी सोयगावात शिवसेनेचे रामरक्षा आंदोलन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**सोयगाव** : अयोध्येतील श्रीराम मंदिरातील कथित देणगी अपहाराची सखोल चौकशी करण्यात यावी, या मागणीसाठी शिवसेनेच्या वतीने राज्यभर सुरू असलेल्या 'रामरक्षा आंदोलन' अंतर्गत गुरुवारी सोयगाव येथील श्रीराम मंदिरात महाआरती व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाला शिवसेना नेते चंद्रकांत खैरे, शिवसेना उपनेते सुभाष पाटील, शिक्षक सेनेचे पद्माकर इंगळे, महिला आघाडीच्या उपजिल्हा संघटक नलिनी बाहेती, विधानसभा संघटक



मीरा देशपांडे, तालुकाप्रमुख दिलीप मचे, शहरप्रमुख रविंद्र काटोले, डॉ. रघुनाथ फुसे, सूर्यकांत गवळी, उपशहरप्रमुख सुरेश फुसे, दीपक बागुल, दुर्गादास केनेकर, महेश जोशी, सुधाकर तेली, विजय पाटील, शांताराम जोशी, विभागप्रमुख गजानन गव्हाड, गणेश कापरे, उपविभागप्रमुख बबन रोकडे, शाखाप्रमुख ज्ञानेश्वर शिंदे, मीराबाई बारी, सविता क्षीरसागर यांच्यासह शिवसैनिक व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी श्रीरामाच्या प्रतिमेसमोर महाआरती करण्यात आली. तसेच रामरक्षा स्तोत्र, भीमरूपी स्तोत्र आणि हनुमान चालीसा यांचे सामूहिक पठण करून आंदोलनाला धार्मिक स्वरूपातून पाठिंबा व्यक्त करण्यात आला.

# जिल्ह्यातील वर्षातील पहिले नेत्रदान; दोघांना मिळणार दृष्टी

हिंदु प्रकाश वार्ता

**परभणी,:** जिल्ह्यात यंदाच्या वर्षातील पहिले नेत्रदान पार पडले असून, या नेत्रदानामुळे दोन अंध व्यक्तींना दृष्टी मिळणार आहे. परभणी येथील महेश अनंतराव कुलकर्णी (वय ४९) यांचे दि. १५ जुलै रोजी दुपारी २.४५ वाजता जिल्हा रुग्णालय, येथे निधन झाले. त्यानंतर नेत्र विभागाशी संपर्क साधत नेत्रदानाचा निर्णय कळवला. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नागेश लखमावार व अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सारिका बडे यांच्या मार्गदर्शनाखाली नेत्र शल्य चिकित्सक डॉ. गजानन कोंडावार तसेच मयुर जोशी आणि शिवराज देशमुख यांनी तातडीने नेत्रदानाची प्रक्रिया पूर्ण केली. या कार्यात जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. अर्चना गोरे यांचेही सहकार्य लाभले.

संकलित नेत्रबुबुळे पुढील प्रत्यारोपणासाठी जालना येथील नेत्रपेढीकडे पाठविण्यात आली आहेत. या नेत्रदानामुळे दोन अंध व्यक्तींना दृष्टी मिळण्यास मदत होणार आहे. मृत्यूनंतर नेत्रदानाचा संकल्प करून अधिकाधिक नागरिकांनी नेत्रदानासाठी पुढे येण्याचे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नागेश लखमावार यांनी केले आहे.

# भरोसा सेलच्या मध्यस्थीने सहा महिन्यांत 600 पैकी 280 पती-पत्नींमध्ये यशस्वी समेट; अनेक कुटुंबे पुन्हा एकत्र

## भरोसा सेलच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सर्व पक्षीय मुस्लिम आघाडी व नशामुक्त अभियानतर्फे गौरव

**छत्रपती संभाजीनगर | प्रतिनिधी** : पती-पत्नींमधील कौटुंबिक वाद, मतभेद व दुरावा दूर करून मध्यस्थी व समुपदेशनाच्या माध्यमातून कुटुंबांना पुन्हा एकत्र आणण्याचे उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पोलीस विभागाच्या भरोसा सेल येथील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सर्व पक्षीय मुस्लिम आघाडी व नशामुक्त अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने सिल्लीखाना येथील महिला मंडळ कार्यालयात शाल, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमास सलीम सर, पत्रकार अब्दुल कय्यूम, युसूफ खान, राधाकिशन पंडित, राहुल शिरसाट, भीमसेन कांबळे, अशरफ पठाण, हफीज अली, बने





खाँ पठाण, खालेद नाहदी, खीजर सिद्दीकी, फारुख खान, शेख अब्दुल रईस, सलीम शाह, सैय्यद करीम तसेच सर्व पक्षीय मुस्लिम आघाडी, नशामुक्त अभियान आणि विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी पोलीस निरीक्षक सुनीता मिसाळ, शाहीन खान, सुषमा जिनाचंद्र डांगे, रमेश नारायणराव श्रीखंडे, संतोष गोविंदराव त्रिभुवन, साधना अनंत परळीकर, मंगल लक्ष्मणराव काळे, अमृता जगदीश बरेटीये, सरला तेजराव सपकाळ, कल्पना तुकाराम दौड, प्रदीप अर्जुन पवार तसेच उज्वला अशोकराव देशमुख यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमात बोलताना प्रभारी अधिकारी सुनीता मिसाळ यांनी सांगितले की, भरोसा सेलकडे गेल्या सहा महिन्यांत सुमारे ६०० कौटुंबिक प्रकरणे दाखल झाली होती. त्यापैकी २८० प्रकरणांमध्ये यशस्वी समेट घडवून पती-पत्नींना पुन्हा त्यांच्या कुटुंबात एकत्र पाठविण्यात आले. समाजातील सकारात्मक कार्याची दखल घेऊन सर्व पक्षीय मुस्लिम आघाडी व नशामुक्त अभियानाने केलेला हा सन्मान संपूर्ण टीमसाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले. कौटुंबिक वाद सोडविताना अनेक अडचणी येतात; मात्र समुपदेशन, संयम आणि संवादाच्या माध्यमातून कुटुंबे पुन्हा एकत्र आणण्याचे कार्य भरोसा सेल सातत्याने करत असल्याचेही त्यांनी सांगितले.

सर्व पक्षीय मुस्लिम आघाडीचे संस्थापक अध्यक्ष साजिद मौलाना यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, समाजात शांतता, कुटुंबव्यवस्था आणि सामाजिक सलोखा टिकवून ठेवण्यासाठी भरोसा सेलची संपूर्ण टीम अत्यंत मोलाचे कार्य करत आहे. पती-पत्नींमधील मतभेद मिटवून त्यांना पुन्हा एकत्र आणण्याचे कार्य समाजासाठी प्रेरणादायी आहे. प्रत्येक कुटुंबात छोटे-मोठे मतभेद होत असतात; मात्र ते संवाद, समजूतदारपणा आणि परस्पर विश्वासाच्या माध्यमातून घरातच सोडविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यामुळे अनेक कुटुंबे तुटण्यापासून वाचू शकतात, असे आवाहन त्यांनी केले.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911